

# श्री साईलीला

या अंकांत—


- मनांत आलं कीं—
- नामदेवांची हिंदी कविता
- नामानुसंधान
- यमुना-इंद्रायणी संगम
- भक्ताधीन-भगवान
- नामदेवांची अमृतवाणी !
- दानाचा मंत्र
- साधकाची शिदोरी
- ययाति राजाची गोष्ट
- छोट्यांसाठीं विनोबांच्या गोष्टी
- ईश्वराचें दर्शन
- साई काय तुला वाहूं
- संतकवि श्रीदासगणूमहाराज
- ईश्वरी साक्षात्कार व संपन्नता
- कोण तुजसम मज साईराया
- भक्तास आलेला अनुभव
- कृष्णा-गोपीचा स्नेहाचा खरा अर्थ
- शिरडी वृत्त





५० पैसे

फेब्रुवारी १९६८

स्थापना १९१६



साईबाबांच्या मूर्ती,
पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू
सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर,

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं.
३५५७३१



# श्री साई वाक्सुधा

ग्रंथ वाचल्यानें आपला कार्यभाग साध्य होत नाहीं. जें वाचलें तें आपल्या कृतींत उतरलें पाहिजे. त्या ग्रंथांतील भावार्थाचा आपण निदिध्यास घेतला पाहिजे. तसें घडलें नाहीं तर पुस्तकीज्ञान व्यर्थ होय. तुम्हीं वेद वाचा, उपनिषदें वाचा, गीता वाचा किंवा रामायण. महाभारत वाचा जें आचरणांत येईल तेवढें तुमचें. बाकीचें त्या ग्रंथाचें. तें केवळ ग्रंथांत गडप होऊन रहायचें. तुम्हीं कोरडे पाषाण ! असें होतां कामा नये,

—श्रीसाईसच्चरित्

---


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४६ वें ] फेब्रुवारी १९६८ [ अंक ११ वा

: संपादक :

**श्री. द. दि. पाटणकर**

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

**टे. नं. ४४३३६१**

: कार्यालय :

**साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.**

## प्रिय वाचक—

पुष्कळ लोकांना दुसऱ्यांची सुधारणा करण्याचा ध्यास लागून राहिलेला असतो. बस्स ! जगाच्या, इतरेजनांच्या सुधारणेसाठीं आपण झटलें पाहिजे. त्यांतच जीवनसाफल्य आहेही असते. त्यांची विचारसरणी; परंतु स्वतःकडे मात्र त्यांचें दुर्लक्ष असतें. स्वतःमध्यें जे दुर्गुण आहेत त्यांची चिंता नाहीं. चिंता करायची ती इतरांची !

प्रत्येकानें प्रथम स्वतःच्या सुधारणेकडे शक्य तेवढं लक्ष पुरविलं पाहिजे. 'आप भला तो जग भला ! असें म्हटलें आहे. प्रथम आपली सुधारणा आणि मग जगाची.

तुमच्या मनांत राग, द्वेष, मत्सरादि दुर्गुण भरलेले असतात, मी मोठा, मी शहाणा, मी इतरांची सुधारणा करणार, मला लोकांनीं मान द्यावा हे विचार तुमच्या मनांत वावरत असले तर तुमच्या हातून सुधारणेचें कार्य बिलकूल घडून येणार नाहीं. तुम्ही मिळवाल काय ! तुमच्याकडून इतरांची सुधारणा होणार नाहीं व स्वतःची तर नाहींच नाहीं.

तुमचें चारित्र्य निर्मळ पाहिजे. तें तसें आहे कीं नाहीं हें समजण्याइतकी पात्रता तुमच्यांत असली पाहिजे. प्रथम स्वतःचें चारित्र्य सुधारण्याकडे आपण सर्व लक्ष पुरविलें पाहिजे. स्वतः चारित्र्य संपन्न असलेला माणूसच इतरेजनांची सुधारणा करूं शकेल.

जोंपर्यंत तुमच्याठायीं राग, द्वेष, मत्सरादि दुर्गुण वास करीत आहेत, तोंपर्यंत तुम्ही स्वतःसाठीं किंवा दुसऱ्यासाठीं कांहीं करूं शकणार नाहीं हें निश्चित समजा, जोंपर्यंत तुमच्या अंतरांत उपरोक्त दुर्गुणांचें वास्तव्य आहे, तोंपर्यंत सभोंवारच्या एकंदर परिस्थितीचें योग्य आकलन तुम्हांला करतां येणार नाहीं आणि योग्य आकलन न झाल्यामुळें नेमकें काय केलें पाहिजे याची तुम्हांला जाणीव होणार नाहीं. तुमच्या मनांत सुधारणाविषयक वाटेल तेवढे विचार येईनात का. ते तुम्ही अंमलांत आणूं शकणार नाहीं.

स्वतःची सुधारणा केल्याशिवाय अर्थात् स्वतःमधील दुर्गुणांचें निर्मूलन केल्याशिवाय दुनियेच्या सुधारणेसाठीं बाहेर पडाल तर काय होईल माहीत आहे ?

तुमच्यातील दांभिकपणांत भर पडत जाईल. तुमच्यांत मोठेपणाचा खोटा अभिमान निर्माण होईल. हा दांभिकपणा तुमचा शेवटीं दाह करून टाकील. तुमची होळी करील. खोट्या अभिमानामुळें तुमचें एक दिवस पूर्णपणें पतन झालेलें तुम्हीं पहाल. त्यामुळें स्वतःसभोंवार तुम्हीं वैरी निर्माण कराल. तुम्हीं अस्वस्थ व्हाल. आणि शेवटीं पस्तवाल.

तेव्हां मुख्य मुद्दा लक्षांत नेहमीं बाळगण्याचा तो हाच कीं तुम्हीं प्रथम स्वतःचें भलें करण्यासाठीं झटलें पाहिजे. तुम्ही भले बनल्याशिवाय जग भलें करण्याची तुमची आकांक्षा व्यर्थ आहे याची मनाशीं नेहमीं खूणगांठ बांधून ठेवा.

तुमच्यांत भलेपणा आला, तुम्ही स्वतःचें कल्याण साधलें म्हणजे दुसऱ्याचें भलें करण्याची, दुसऱ्याचें कल्याण साधण्याची भाषाच तुमच्या तोंडून येणार नाहीं आणि ती येण्याची जरुरीही नाहीं.

मग काय होईल ? तुम्हीं न बोलतां चालतां तुमचें वागणें सवरणें हेंच दुनियेची सुधारणा करण्यास समर्थ होईल. मग तुमचें प्रत्येक कृत्य, प्रत्येक हालचाल व तुमचा प्रत्येक व्यवहार जगाचें भलें करण्यास कारणीभूत होईल.

यासाठीं साईबाबापाशीं आपण अहर्निश हीच प्रार्थना करायची की, बाबा ! माझें भलें करण्यासाठी अहोरात्र झटण्याची मला बुद्धि दे. माझ्याठायी जे दुर्गुण वास करीत असतील ते शोधून काढून त्यांचें निर्मूलन करण्यासाठीं बद्धपरिकर होण्याची मला बुद्धि दे.

—संपादक



# मनांत आलं कीं—

लेखक : द. शां. टिपणीस

[ ऑक्टोबर १९६७ च्या अंकावरून पुढें चालू ]

( २५ ) जाऊं तेथें सुवास दरवळावा म्हणून कपड्यांना अत्तर लावण्याचा अलिकडे प्रघात पडत चालला आहे. उद्देश कांहींहि असला तरी उपक्रम स्तुत्य आहे. माणसाची माणसाला घाण वाटूं नये असें वागणें केव्हांही चांगलेच. पण हा प्रकार म्हणजे उधार-उसनवार आहे. फत्तराला अत्तर लावून सुवास आणला म्हणून कांहीं फत्तर अत्तर ठरत नाहीं. कपड्याला सुवास लावल्यानें कपड्याचा मालक सुवासिक ठरणार नाहीं. कपड्याला सुवास असला तर चांगलें पण अंतकरणांत सु-वास असला तर सोन्याहून पिवळें. कपड्याला Scent नें सुवास येतो तर अंतःकरणांत Saint मुळें सु-वास राहतो. हा अंतरंगातला सुवास आपल्या मालकीचा. मग जाऊं तेथें सुवास दरवळणारच. लोक प्रसन्न होणार. कपडे स्वच्छ व सुवासिक ठेवण्याइतकेंच चारित्र्य स्वच्छ व सु-वासित ठेवण्याकडे लक्ष दिलें तर सगळा समाज सुवासीत होईल. म्हणून Use not only scent but saint also. कारण दोन्ही सेंटचा सुवास दरवळतो. एकाचा क्षणैक तर दुसऱ्याचा चिरंजीव. एकानें नाकाला आल्हाद होतो तर दुसऱ्यानें आत्म्याला आल्हाद होतो.

( २६ ) वृद्धपणीं केस पिकतात. कित्येकांचे अकाली पिकतात. कांहीं असलें तरी एकच. केस पिकायचे तेव्हांच पिकतात. खेद एवढाच कीं जसजसें केस पिकत जातात तसतसें मन पिकत, परिपक्व होत नाहीं. केस पिकत जातात पण मन कच्चे हिरवट होत जातें. म्हणून वृद्धाच्या ठिकाणीं भलतेंच तारुण्य व तारुण्याच्या ठिकाणीं अकालीं वृद्धत्व दिसतें. केसाबरोबर मनही परिपक्व होत गेले तर केस व मन यांतील व्यस्तपणा जाऊन जीवनांत समतोलपणा साधला जाईल. अकालीं केस पिकणें चांगलें नसेल पण अकालीं मन परिपक्व होणें हानिकारक नाहीं. ज्ञानेश्वर, शंकराचार्य यांचे केस पिकले नाहींत पण मन व बुद्धि लौकर परिपक्व होऊन त्यांतून पाझरणारा ज्ञानामृताचा सुधारस जगाला चाखायला मिळाला. त्यांचे केस काळे होते पण मन शुभ्र होतें. हल्लीं मात्र उलटी गंगा वाहते.

(२७) केसाची आपण किती निगा राखतो. अशीच निगा मनाची राखली तर ! केस वाढले वा आकाराबाहेर गेले तर कापून त्याला आपण व्यवस्थित आकार देतो. पण मन आकाराबाहेर गेले तर आपण लक्ष देत नाहीं. नव्हे तें लक्षांतच येत नाहीं. मनालाही आकार देणारी माणसें जगांत आहेत. पण त्यांचा फायदा आपण घेत नाहीं. केस वारंवार धुवून स्वच्छ ठेवतो. पण मन कधींतरी धुवून स्वच्छ करतो. केस स्वच्छ होण्यास अनेक साधनें वापरतो. पण मन स्वच्छ करण्यास नामसाधन नाममात्रही वापरत नाहीं. केस वाढण्यासाठीं व ठिकाणावर राहण्यासाठीं तेलें, ब्रिलियंटाइन वगैरे साधनें आपण वापरतो पण मनाच्या वाढीसाठीं व ते ठिकाणावर राहण्यासाठीं भक्ति–नामस्मरण वगैरे साधनें आपण कधीं वापरतो ? आपणाला शरीर आहे याची जाणीव असते पण मन आहे हें लक्षांतच राहत नाहीं. कारण देहबुद्धि.

(२८) नदीच्या प्रवाहांत पोहायला उतरणें न उतरणें हा खुषीचा प्रश्न असला तरी कालप्रवाहांत उतरणें खुषीचें नाहीं. जन्म म्हणजेच कालप्रवाहांत उतरणें. पट्टीचा पोहणारा नदीच्या प्रवाहाचा रोख लक्षांत घेऊनच स्वतःला तरंगत ठेवतो व तरून जातो. कालप्रवाहाची दिशा लक्षांत घेऊन तिच्याशीं समांतर राहण्याचा प्रयत्न केला व हातपाय हलवीत राहिले तर आपण तरून जाऊं शकतो. पण बहुतेक स्वस्थ बसतात किंवा प्रवाहाच्या उलट जाऊं पहातात व थकले कीं तक्रार करतात. काल-प्रवाहांत पोहणाऱ्या मंडळींना अधून मधून कपडे बदलण्यासाठीं काठावर यावें लागतें. व कपडे बदलून झालें कीं पुन्हां प्रवाहांत जावें लागते.

(२९) शरीर व मन यांची बेरीज होऊन मानव तयार झाला. पण मानवांतील मन आपण उणे करून बाकी जें शरीर तिकडेच लक्ष देतो. म्हणून आपलें जीवन सदैव उणेच राहते. तें पूर्ण करण्यासाठीं बेरीजच पाहिजे. जीवनांत सदैव ज्ञान, भक्ति विवेक वैराग्य वगैरेंची भर घालीत राहिले तर खत, पाणी घातलेल्या फुलझाडाप्रमाणें तें फुलून टवटवीत होईल. शरीर पोषणास स्वच्छ व पौष्टीक अन्न लागते तसे मन पोषणास शुद्ध, पवित्र व पौष्टीक विचारांची आवश्यकता असते. रोगजंतू शरीराला मारतात तर आळस मनाला मारक असतो. रोगजंतुवर विषारी फवारे मारल्यानें तें नाहींसें होतात पण आळस विषारी फवाऱ्यांनीं फोफावतो. त्यावर चांगल्या विचाराचे फवारे मारून तो नाहींसा करावा लागतो. सूर्य उगवला कीं अंधार पडतो. काम करूं लागले कीं आळस पळतो. यास्तव मन सतत चांगल्या कामांत गुंतवून ठेवणें चांगलें.

(३०) दिव्याची ज्योत फडफडत राहिली तर स्वच्छ उजेड पडेल काय ? विजेचा दिवा चमक चमक करीत राहिला तर त्या प्रकाशांत कामधंदा सुचेल काय ? मन विषयांच्या वाऱ्यानें फडफडत राहिलें तर कार्य कसें होईल ? अस्थिर व चंचल

मन एक ना धड भाराभर निकामी चिंध्या निर्माण करतात. स्थिर व शांत मन स्थिर व ठिकाऊ काम करूं शकते. शांत जलाशयांतच बाजूच्या सृष्टीसौंदर्याचें प्रतिबिंब पडते. स्थिर मनांतच आत्म्याचें तेज फाकते. म्हणून योगी योगानें व भक्त भक्तीनें मन स्थिर करतात. जलाशयावर सूक्ष्मांत सूक्ष्म जरी लाट उठली तरी प्रतिबिंब नाहींसे होते. मनांत जरी अगदीं पुसट विचार निर्माण झाले तरी ते आत्म्याचें प्रतिबिंब नाहींसें करतात. स्थिर मनच अस्थिर जगाला जिंकूं शकते.

( ३१ ) Practice makes a man perfect. सतत पोहल्यानें पट्टीचे पोहणारे निर्माण होतात. स्वयंपाक करून कुशल आचारी होतात. सतत सायकलवर बसणारा सायकलपटू होतो. नवीन गोष्टीला मन बुजते व कार्याला अडखळतें. पण एखादी गोष्ट सतत करीत राहिल्यानें तिची संवय होतें. संवय अंगवळणी पडली कीं, कोणतीहि गोष्ट सहज सुलभतेनें व कमी श्रमांत ती करतां येते. मूल सुरवातीला चालतांना किती धडपडतें, अडखळतें, पडतें. पण सतत प्रयत्नानें चालू लागतें, पुढें धांवूं लागते. एवढेंच नव्हे तर जागतिक ऑलिंपिक धांवण्याची शर्यतहि जिंकूं शकतें. आपलें निम्मेपेक्षां अधिक रोजचें जीवन संवयीमुळें चालूं असते. सतत प्रयत्नानें संवय, संवयीमुळें सुलभता, सुलभतेमुळें श्रमबचत अशी ही साखळी आहे. म्हणून चांगल्या संवयी अंगवळणी पाडून घेण्यांत आपण सतत प्रयत्नशील असावें.

( ३२ ) हिटलरचा उजवा हात, प्रचारतज्ञ व अनुधिकचाणक्य गोबेल्स यानें प्रचाराचें एक तत्त्व सांगितलें आहे. खोटी गोष्ट सतत लोकांपुढें ठेवीत राहिली तर ती हळूं हळूं लोकांत खरी वाटूं लागते. पंचतंत्रांतलि त्रयाणां धूर्तानां ही गोष्ट हेंच सांगते. नळाच्या सतत धारेमुळें त्याच्या खालील दगडालाही खड्डे पडतात मग मानवी मनावर सतत एका गोष्टीचा मारा केला तर त्याचाही भेद होणें अशक्य नाहीं. गोबेल्स तत्त्व खरें आहे. ते मानसशास्त्र सिद्ध आहे. पण त्याचा उपयोग अग्नीनें घराला आगी लावण्यासारखा करण्यांत आला. लोकांची मनें मारून टाकण्यांत व त्यांचें नीतिधैर्य खची करण्यांत त्याचा उपयोग झाला. पण त्या तत्त्वाचा विधायक उपयोग नाहीं कां करतां येणार ? नळाच्या सतत धारेमुळें पत्थर फुटतात मग नामाच्या सतत धारेनें संकटें कां भंगणार नाहींत ? धरणें बांधल्यानें फायदा होतो मग देवाकडे धरण धरल्यानें फायदा कां होणार नाहीं. सतत नामस्मरणानें वा कीर्तन–भजनानें मन मरत नाहीं उलट प्रफुल्लीत होते. नीतिधैर्य खचत नाहीं उलट वाढीस लागते. म्हणून गोबेल्स बोलला तें सत्य मात्र उलट अर्थानें.

( ३३ ) एक पतंग खोलींत आला व त्यानें दिव्याच्या ज्योतीवर झडप घातली व बिचारा मरून पडला, मानव त्याला हंसला. " काय वेडा आहे तरी. ज्योतीनें

भाजते एवढेंहि या मूर्खाला कळत नाहीं. आंधळ्यासारखा गेला ज्योतीवर." देव मानवाला हंसला. "काय बेटा मूर्ख आहे. पतंगाला हंसतो, हा बेटा तेंच करतो. अधिकच मूर्ख आहे." खरंच आहे नाहीं हें ? मानव तरी काय पतंगाचाच भाई. शरीर मानवाचें पण मन पतंगाचे. कनक व कामिनी यांच्या तेजानें दिपून सारखी झडप घालतो व त्या नादांतच गडप होतो, अगदीं अंधळा बनतो. रेल्वे लाईनवर काम करणारे कसे विजेच्या तेजानें दिपून जातात व त्यांना कांहीं दिसेनासें होतें. अगदीं तसेंच. काम करणारे आपल्या चक्षूला चष्म्याचें झडप लावतात. त्यामुळें अंधत्व जातें, स्वच्छ दिसते व कार्य होते. माणसानें आपल्या ज्ञानचक्षूंना सद्सद्विवेक बुद्धिचा चष्मा लावला तर मग त्याची स्थिति पतंगाप्रमाणें न होता कनक व कामिनीच्या साह्यानें तो चांगली कार्ये घडवून आणील.

( ३४ ) नंदादीपांतील वात कणाकणानें झिजते व अंधारांत इतरांना प्रकाश पुरवते. देवाचा नंदादीप सांगतो कीं बाबांनो, एकमेकांसाठीं कणाकणानें झिजा म्हणजे कल्याण होईल. लोककल्याणासाठीं आत्माहुति देणारी ती वात. पण कोण तिच्यासाठीं हुतात्म्याचें स्मारक बांधणार ? कोण तिला मरणोत्तर परमचक्र वा वीरचक्र देणार ? लोककल्यासाठीं झिजणाऱ्या अनेक वाती जगांत होऊन गेल्या व आहेत. पण लक्षांत कोण घेतो ? आकाशांत गुपचूपपणें जाणारे पावसाळी ढग कोणाच्या लक्षांत येतात ? पण एखादा वाजतगाजत गर्जत गेला कीं आपलें लक्ष ताबडतोब त्याच्याकडे जाते. शांत, अबोल व एका कोपऱ्यांत झिजणाऱ्या निःस्वार्थी वातीपेक्षां गडगडाटांत चमकणाऱ्या विजेकडेच माणसाचे अधिक लक्ष जाते, असा हा मानवी स्वभाव. पण तिकडे लक्ष न देतां लोककल्यासाठीं जें करायचें तें संत शांतपणानें करीत असतात.

( ३५ ) रस्त्याला खांचखळगे, खड्डे असायचेच. केळ्याची व इतर सालपटे इतस्ततः विखुरलेली असायचीच. चालतांना या सर्वांकडे लक्ष देऊन चालावें लागतें. नाहींतर पाय मुरगळण्याचा, घसरून पडण्याचा शंभर टक्के संभव. जीवनाचा मार्ग चालतांना अशीच सावधगिरी घ्यावी लागते. अडीअडचणीचे खांचखळगे ओलांडावे लागतात. मोहाची—लोभाची सालपटे टाळून जपून पाऊल टाकावें लागते. आपल्या जीवनांत पायाखाली पहावें. दुसऱ्याच्या जीवनाकडे पहाण्याची दृष्टि मात्र उलट असावी. त्याच्या जीवनांतील दोष, उणिवा तसेंच व्यसनाची त्याच्या पायाखाली असलेल्या सालपटाकडे दुर्लक्ष करावें. ती खुबीनें काढून टाकतां येत असतील तर टाकावींत नाहींतर त्याच्या जीवन मार्गांवरील गुळगुळीत, स्वच्छ व सरळ रस्ता तेवढा पहावा. या दृष्टीनें जीवनांतिल व्यवहार करीत राहिले तर मैत्री, ऐक्य, एकात्मता साधूं शकेल. नाहींतर या गोष्टी द्विधा होतील.

( ३६ ) अन्नधान्याच्याबाबतीत आपली परिस्थिति बिकट झाली आहे. खुद्द अन्नधान्याचीच परिस्थिती बिकट झाली तिथें आपली काय कथा ? पहाना, मूळचा मोत्यासारखा दाणा पण त्याच्या जोडीला गारगोटीचे तुकडे व दगडाचे मणि घेऊन बसले आहेत. गवताच्या काड्या, कांद्याची व लसणाची सालपटे आहेतच. आळ्याही त्याच्याच आळीला येऊन राहिल्या आहेत. रेशनचे धान्य व समाज दोन्ही गारली झाली आहेत. चांगलें निवडून काढावें लागते. धान्य खराब म्हणून कांहीं आपण ते टाकून देत नाहीं. निवडतो, चांगलें घेतो वाईट टाकून देतो. समाजांत वावरतांना अशीच दृष्टि असावी. चांगलें घ्यावें. वाईट टाकावें. गुण पहावेत, दोष टाळावेत. आपलें शेजारीपाजारी, नातेवाईक, ओळखीपाळखीचे यांच्यांत गुण पहावें. ते आपण घ्यावेत व त्यांचे वाढीस लावावेत. यानें समाज सुधारेल. धान्यांत चांगल्या दाण्याचें आधिक्य होणें म्हणजे केरकचरा कमी होणें नव्हे काय ?

## नामस्मरणाचें महात्म्य

ज्ञानयोग, भक्तियोग, कर्मयोग वगैरे जे चार योग सांगण्यांत आले आहेत; त्यापैकी कोणताही एक योगमार्ग थेट ईशचरणापर्यंत तुम्हांला घेऊन जाऊं शकत नाहीं. खरें सांगायचें केवळ त्यांच्या सहाय्यानें भगवंताच्या पवित्र मंदिरांतही तुमचा प्रवेश होऊं शकणार नाहीं. त्यांच्या सहाय्यानें फार तर तुम्हीं मंदिराच्या दरवाज्यापर्यंत पोहचूं शकाल एवढेंच. भगवंताच्या चरणकमलांस स्पर्श करावयाचा आहे ना ! मग त्यासाठीं तुम्हीं नामस्मरण–योगाचीच कांस धरली पाहिजे. देवत्व गांठण्याचा हा एकमेव राजमार्ग आहे. भारतांतीलच नव्हे तर जगांतील साऱ्या साधुसंतांनीं याच मार्गानें जाऊन देव आपलासा करून घेतला आहे; व सर्वांच्या कल्याणासाठीं त्याच मार्गाचें महात्म्य त्यानीं वर्णिलें आहे.

—गुरुदेव रानडे

# नामदेवांची हिंदी कविता

लेखक : गणेश विष्णु कविटकर, एम्. ए.

नामदेवांच्या पदांना हिंदी भक्ति-साहित्यांत वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. त्यांच्या फुटकळ पदांची संख्या विपुल असून ती एकत्रित करण्यासाठी आवश्यक असणारी साधनें विखुरलेली असल्यांमुळें व काळाच्या उदरांत गडप झाल्यामुळें त्यांचा शोध घेतांना फार कष्ट घ्यावे लागले. आतांपर्यंत मिळालेल्या पदांची संख्या ३११ असून साखी ( श्लोक ) संख्या २७ आहे. नामदेवांच्या या काव्य-रचनेंतून अंतर्भूत असलेली आत्मपरता ( Subjectivity ) हे तिचे विलोभनीय वैशिष्ट्य आहे. भक्तिप्रकाशानें कवीचे हृदयकमल कसकसें फुलत गेले याचे त्यांत वर्णन आहे. विविध मनोवृत्तींच्या पाकळ्यांचे मनोहर दर्शन आहे आणि वात्सल्य स्वरूपाची भावना कमलदेठाप्रमाणें त्यांत अनुस्यूत आहे. त्यांतील आत्मज्ञान, ईश्वरदर्शनाचा अनुभव आणि वैचारिक दर्शन साधकांना मार्गदर्शन करणारे आहे. नामदेवांच्या या काव्यरचनेनें वज्रयानी व नाथपंथी शुष्क योग किंवा ज्ञान सांगणाऱ्या जुन्या काव्य-धारेहून भिन्न काव्यधारा निर्माण केली व त्यांच्यानंतर होऊन गेलेल्या उत्तर भारतीय निर्गुण कवींना मार्गदर्शन केले. कबीर, दादूदयाळ, रैदास, रज्जबजी, स्वामी सुंदरदास आणि मिराबाई इत्यादि हिंदी कवींनी नामदेवांचे हे ऋण प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मान्य केले आहे. अशा या महत्वपूर्ण काव्यरचनेचे संशोधन करीत असतां जे काव्य-संग्रह पाहावें लागले त्यांची प्रस्तुत लेखांत ओळख करून द्यावयाची आहे.

महाराष्ट्रांत ज्या अभंग-गाथा उपलब्ध आहेत त्यांतच नामदेवांचे हिंदी पदांचे संकलन आढळते. अर्वाचीन काळांत मुद्रण कलेच्या प्रसारानंतर नामदेवांच्या अभंग वाणीचे पहिले मुद्रण रा. श्री. गोंधळेकर यांनीं १८९२ मध्यें केले. यानंतर श्रीनामदेव व त्यांच्या कुटुंबातील व समकालीन साधूंच्या अभंगांचा गाथा, तुकारामतात्या यांनीं १८९४ मध्यें छापला. या गाथ्यांत नामदेवांची १०६ हिंदुस्थानी पदें मुद्रित केली आहेत. शके १८३१ ( सन १९०९ ) च्या नामदेव गाथेच्या प्रतींत त्र्यंबक हरी आवटे यांनीं १०२ हिंदी पदे संकलित केली आहेत. ही पदे त्यांना नानामहाराज साखरे, मिरीकर व नशिरापूरकर येथील वारकरी सांप्रदायिकांच्या पुरातन लिखितांत

मिळाल्याचा व त्यावरून पाठ दुरुस्त करून गाथा तयार केल्याचा उल्लेख आहे. चित्रशाळा प्रेसनें ह. भ. प. कै. विष्णुबुवा जोग यांच्या सांप्रदायिक पद्धतीनें शुद्ध केलेला गाथा ( चवथे मुद्रण ) नोव्हेंबर १९५७ मध्यें छापला. या प्रतींत हिंदी पदांची संख्या १०३ आहे. श्रीगुरुग्रंथांतील कांहीं पदें त्यांत आहेत. या गाथ्यांचे स्वरूप संग्रहाचे असावें अशीच या गाथ्यांच्या संपादकाची भूमिका होती.

मुद्रणामुळें पद-संग्रह सुलभ झाले खरें, परंतु गुरुमुखांतून मिळणाऱ्या काव्याइतके ते मौलिक व प्रभावशाली राहिले नाहींत. प्रत्यक्ष हस्तलिखिते लिहून घेतांना महत्वाचा गुण लागतो तो त्या भाषेशी दृढ परिचय. याच गुणाचा अभाव, अपरिचित असे भाषेचे स्वरूप, शब्द न तोडता लिहिलेल्या ओळी, विराम चिन्हांची उणीव, हिंदी व्याकरणाचें साधारण ज्ञान, अध्यात्मासारखा कठिण विषय, यामुळें या प्रतींतील पदांच्या मूळ पाठांचे तंतोतंत स्वरूप संदिग्ध राहिले आहे. असे होण्यास आणखी दोन कारणें संभवतात. एक म्हणजे मुद्रणालयांत जुळणी करणारात भाषा-ज्ञान मुळचेच कमी आणि दुसरे म्हणजे सांप्रदायिक हस्तलिखितांचे लेखक ठराविक चाकोरी सोडण्यास अनुत्सुक. याचा परिणाम मूळ पदांतील भाषेचा पेहराव बदलण्यांत झाला. हस्तलिखितांतील स्वाभाविक बदलामुळें हीं पदें अधिक दुर्बोध झाली आणि नामदेवाच्या पदांचे प्रकाशन अशुद्ध व अपूर्ण राहिले. मुद्रित हिंदी पदांतील आढळणारी सर्व प्रमादस्थलें व शंकास्थानें एकत्र दाखवावयाची म्हटल्यास बराच विस्तार करावा लागेल. तूर्त तेवढा अवकाश नसल्यानें वानगीदाखल कांहीं नमुनें समोर ठेवीत आहे.

वरील सर्व प्रतींत असा एक पाठ आहे—

भणत नामदेव अये बीबी घाना ।
देह घोडापर चढाई कान्हा ॥

कोणाहि प्रकाशकाला शंका आली नाहीं कीं 'अये बीबी घाना' याचा अर्थ काय ? हिंदी भाषेत मिळणाऱ्या पदांत ही चरणें अशी आहेत—

भणत नामदेव आप बिधांनां ।
दह्र घोडानं चढाइ हौ कान्हा ॥ ( ३९-२ )

आतां या चरणांचा कसा सरळ अर्थ लागतो पहा. नामदेव म्हणतात, परमेश्वरा ! तूं स्वतःच विधाता या सृष्टीची रचना करणारा आहेस. दशेंद्रियरूपी ( देह ) घोड्यावर आक्रमण करणारा तूं श्रीकृष्ण आहेस.

(२) अवनी न बिसारूं राम संभारू ।

या पाठावरून कांहीं अर्थबोध होत नाहीं. त्याऐवजी

अब न बिसारूं राम संभारू । (२७–१)

(आतां रामाचे स्मरण मी चुकणार नाहीं. चुकेल तर सर्व हरेल!) असा शुद्ध पाठ असावयास पाहिजे.

(३) कित्येक ठिकाणीं आरंभीचीं दोन्ही चरणें गाळून पदांची सुरुवात केलेली आढळते. उदा० "अहा तुम गिरीवर" या पदाच्या आरंभी असलेली पुढील चरणें गाळली आहेत—

तुम बिनु धीर पक रहूं नहि न्यारा ।
सुन यह केसव नियम हमारा ॥ (१९१–१)

(केशवा! माझा नियम ऐक. मी तुझ्याशिवाय एक क्षणदेखील निराळा राहूं शकत नाहीं.)

(४) मराठीतील पदसंग्रहाच्या या प्रती कित्येक ठिकाणीं अर्थाचे अनर्थ करणाऱ्या आहेत–जसे "मै मनीषा जनम निरबंध ज्वाला" माझा मानव जन्म हीच एक अनिर्बंध ज्वाला आहे. ती सतत मला जाळीत आहे (१२–२), ज्या ऐवजी "मैने निरवा जन मानीर बधन ज्वाला" असा दुर्बोध पाठ; 'नामा का ठाकुर', (नामदेवांचा परमेश्वर) ज्या जागीं 'नामा काटा कुर' अशी शब्दांची घृणास्पद चिरफाड! शिवाय या प्रतींतील मुद्रणदोष जागोजागीं खटकतात. म्हणून हिंदी पदांच्या या संहिता अत्यंत सावधानतेनें उपयोगांत आणावयास पाहिजेत.

वरील मुद्रित वाङ्मयाखेरीज पंढरपूर, नगर, धुळें, पुणें विद्यापीठ येथें मिळणाऱ्या हस्तलिखितांत नामदेवांची कांहीं पदें आढळतात. हीं पदें अर्धवट मराठी व अर्धवट हिंदी अशा स्वरूपांत आहेत. महाराष्ट्रांतून उपलब्ध होणाऱ्या नामदेवांच्या हिंदी पदांचे स्वरूप असें आहे.

उत्तर व दक्षिण भारतांतील हिंदी काव्यसंग्रह पाहिल्याशिवाय नामदेवांच्या हिंदी काव्य-संग्रहाच्या प्रकाशनास शुद्धता व पूर्णता येणार नाहीं. या सर्व संग्रहांत प्रायः पाठभेद आहेत. नामदेवांची पदें पुढील ग्रंथांत आढळतातः—

(१) संत–बानी–संग्रह (बेलवेडिअर प्रेस), प्रकाशित, सन १९५५, बेलवेडिअर प्रेस, इलाहाबाद.

( २ ) श्रीगुरु-ग्रंथ-साहिब, सर्व हिंदी सिक्ख मिशन, अमृतसर.

( ३ ) भक्त शिरोमणी नामदेव की नई जीवनी, नई पदावली, डॉ. मोहनसिंह दीवाना, उमीराई, १९४९.

( ४ ) संत-सुधा-सार—वियोगी हरि, सस्ता साहित्य मंडळ, प्रकाशन, १९५२, नई दिल्ली.

( ५ ) हिंदी को मराठी संतो की देन—आचार्य विनय मोहन शर्मा-बिहार राष्ट्रभाषा परिषद, पटना, मार्च १९५७ ( नामदेव के पद-संग्रह, पृ. २३९-२७० ).

( ६ ) सन्त नामदेव की हिन्दी पदावली— भगीरथ मिश्र व राजनारायण मौर्य, पूना विश्वविद्यालय, पूना, १९६४.

बेलवेडिअर प्रेसनें प्रकाशित केलेल्या संत-बानी संग्रहाचा प्रचार सर्वाधिक आहे. या संग्रहाच्या जडण-घडणीला व रूप-स्वरूपाला संत महात्मे आणि भक्तवर्ग यांनी गायिलेली पदें अमर गीतें यांचा आधार आहे. या संग्रहाच्या दुसऱ्या भागांत नामदेवांची आठ पदें मिळतात. असो. श्रीगुरु-ग्रंथ साहिबांतील नामदेवांच्या हिंदी पदांचा विचार पुढील लेखांत करूं.



# नामानुसंधान

## श्री संत ज्ञानेश्वरांचे विचार

श्री ज्ञानेश सांगतात, "नामस्मरण करणाऱ्या भक्ताजवळ सदा देव उभा असतो. त्याला अखंड देवाचें दर्शन होत असतें. नाम हें गगनाहून मोठें आहे, व्यापक आहे. नामपाठाचें फळ म्हणजे सर्वत्र हरी भरलेला दिसतो. सर्वत्र तदीक्षणाचा अनुभव येतो. सर्व नाशवंत आहे. एक नामच अविनाशी आहे. अविनाशी ईश्वराचाच तें अंश आहे. म्हणून तेंच चांगलें, त्याचेच चिंतन करावें. नामस्मरणानें सर्व पापें दग्ध होतात. नाम अंतःकरणांत भरून गेल्यानें कुविचारांचा पूर्ण विसर पडतो. हाच पाप नाश. नामस्मरणाने साधक ईश्वराशीं समरस होतो, ऐक्य पावतो. कोणत्याही साधनापेक्षां नामसाधन श्रेष्ठ आहे. त्याला कष्टही लागत नाहींत. नामस्मरणा-शिवाय जगणें हें ज्ञानेश्वरांना व्यर्थ वाटतें. म्हणून त्यांनीं नामस्मरणाचा मार्ग आक्रमिला. हरिजपानें प्रपंचाचें घरणें सुटेल. मायेंतून व जन्ममरणाच्या चक्रांतून मुक्तता मिळेल. नामांत द्वैताचा लेशही नाहीं. त्याचा जप केला म्हणजे मायामुलक द्वैताचें भय, प्रपंचाचें भय नष्ट होतें. नामस्मरणानें मिळणाऱ्या अमृताची गोडी, अमीरस, भक्तांना लाभते. योग्यांना केवळ दीर्घकाळ जगण्याची कला साधते, अमृताच्या सेवनाने येणारे अमृतत्व मिळत नाहीं. हरिपाठानें लागणारी आत्मानंद–समाधि हीच सत्य समाधि, हरिनाम हीच अमृतत्व देणारी संजीवनी होय. हा निवृत्तीनाथांचा उपदेश ज्ञानदेव प्रमाणभूत, अगदीं सत्य मानतात. नामापेक्षां श्रेष्ठ तत्त्व कोणतेच नाहीं. उगाच दुसऱ्याच्या मागें जाऊं नको. ज्ञानदेव मौन धरून अंतरीं सदा हरिजप करतात. हरिपाठानें, नामस्मरणानें, सर्वत्र ईश्वर भरलेला दिसतो. त्याच्या शिवाय कांहीं दिसतच नाहीं आणि त्यामुळें भक्त ईश्वरांत प्रवेश करतो. ईश्वरस्वरूपांत सदा राहतो. ईश्वराशीं एकरूप होतो."

"सात्विक कर्मांलाही नामाची, नामस्मरणाची जोडी दिल्यावाचून मोक्षदायक होत नाहीं. तें सत्वगुण वाढवील इतकेच. ब्रह्मनाम व जाति यांच्या अतीत आहे. परंतु अविद्येच्या अंधारांत त्याचें ज्ञान होऊं शकत नाहीं. म्हणून त्याला ओळखण्या-साठीं श्रुतीनें त्याला ॐ–तत्–सत् असें त्रिविध नाम ठेवलें. संसारतापानें तापलेल्या मुमुक्षूंनीं या नांवानें देवाला हांक मारली कीं, तो ओ देतो. देवाचा अद्वैत साक्षात्कार व्हावा, यासाठीं वेदांनीं हा सोपा मंत्र दाखविला आहे. या मंत्रानें ब्रह्माला आळविलें

की मागें ( अज्ञान ) असलेलें ब्रह्म साधकाच्या पुढें येऊन उभें राहते, त्याला ईश्वर साक्षात्कार होतो, परंतु या मंत्राचें, नामाचें हें महत्त्व अत्युच्च साक्षात्कारी पुरुषांनाच समजतें. या मंत्राशीं एकरूप होऊन जें कर्म चालतें, तेंच मोक्षाला नेतें. 'ॐ-तत्-सत्' या मंत्रानें कर्यासगट सर्व कर्म ब्रह्मरूप होतें. मग त्यांत कांहीं कमतरता राहिली किंवा चुकीनें त्यांत निषिद्ध असें कांहीं घडलें तरी तें बाधक होत नाहीं, कारण नामस्मरणाची जोड दिल्यानें, पूर्ण साक्षात्कारानें सर्व कर्म ब्रह्मरूपच होतें, मग त्यांत अपूर्णता कशी राहणार ! या नामाची इतकी थोरवी कशी याचा विचार करशील तर हें नाम म्हणजे प्रत्यक्ष ब्रह्मच आहे हें तुला कळेल. याचें स्मरण विश्वाचें मूळ जें ब्रह्म तेथें पोंचविते, ब्रह्मप्राप्ति करून देते. ब्रह्म हें निर्गुण, अति शुद्ध आहे; परंतु नाम हें त्याचें अंतरंग, त्याला व्यक्त करणारे, त्याचा साक्षात्कार करून देणारें आहे. नाम आणि त्याचा आश्रय ब्रह्म, नामी, यांत अभेद आहे, दोन्ही एकरूप आहेत. म्हणून सूर्योदय झाल्यावर तोच स्वतःला प्रकाशित करतो, त्याप्रमाणें ब्रह्मस्वरूप नाम ब्रह्माचा साक्षात्कार करून देतें. सारांश, नाम म्हणजे प्रत्यक्ष ब्रह्म आहे, त्याच्यावरील तुझी श्रद्धा दृढतर कर. कर्माला त्याची जोड दिली म्हणजे तें बंधक होत नाहीं."

( मूळ श्लोकांत 'ॐ-तत्-सत्' एवढेंच नाम असलें तरी सर्वच नामांना हे विचार लागू आहेत. ज्ञानेश्वर यामांत भेद केव्हांच करीत नाहींत. )



—गृहस्थाश्रमी निःस्वार्थपणें कुटुंबसेवा बजावतो. त्याला त्या कुटुंबापासून कोणता मोबदला मिळतो ? कुटुंबापासून त्याला फायदा न को होऊं द्या; परंतु फायदा नाहीं कसा ? त्या सेवेमुळें त्याला जें आध्यात्मिक मिळतें तें भावी काळाच्या दृष्टीनें बहुमोलाचें असतें. त्याचा पुढील मार्ग त्यामुळें सुकर होतो. त्यामुळें त्याला जें समाधान मिळतें तेंच त्याचें पारितोषिक.

—रमण महर्षि

# यमुना-इंद्रायणी संगम

द. मो. चित्रे

यमुनेच्या काठीं गोपाळांच्या बरोबर नाचणारा-बागडणारा, भक्तांच्या रक्षणासाठीं करांगुळीवर गोवर्धन पर्वत धरणारा, कुरुक्षेत्रावर अर्जुनाला हातीं शस्त्र धरावयास लावणारा भगवान् श्रीकृष्ण इंद्रायणीच्या कांठावर विटेवर उभा रहाण्यासाठीं अवतीर्ण झाला. श्रीकृष्ण जन्माचें वर्णन श्री तुकाराम महाराजांनी किती उत्तमरितीनें केलें आहे !

"अनंत ब्रह्मांडे उदरीं । हरि हा बालक नंदा घरीं ॥ धृ० ॥ नवल केव्हडें केव्हडें । न कळे कान्होबाचें कोडें ॥ १ ॥ पृथ्वी जेणें तृप्त केली । त्यासि यशोदा भोजन घाली ॥ २ ॥ विश्व व्यापक कमलापती । त्यासि गौळणी कडिये घेती ॥ ३ ॥ तुका म्हणे, नटधारी । भोग भोगून ब्रह्मचारी ॥ ४ ॥ सुष्ट प्रवृत्ती जन्म घेतांच दुष्ट प्रवत्तींना थरकांप सुटणारच !

"कृष्ण गोकुळीं जन्मला । दुष्टां चळकांप सुटला ॥ धृ० ॥ होता कृष्णाचा अवतार । आनंद करिती घरोघर ॥ १ ॥ प्रेम नाम वाचें गाती । सदा आनंदे नाचती ॥ २ ॥ तुका म्हणे हरती दोष । आनंदाने करिती घोष ॥ ३ ॥ "बालरूप धारण केलेला भगवान् श्रीकृष्ण तो. बालांचें मन खाऊकडे असणारच ! श्रीकृष्णाच्या अधिपत्याखाली सर्व बालसवंगडी जमलें आणि खाण्यासाठीं काय मिळवावें याचा विचार करूं लागलें. श्रीकृष्णाचा विचार ठरला.

"मेळउनि सकल गोपाळ । कांहीं करिती विचार ॥ धृ० ॥ चला जाऊं चारूं लोणी । आजि घेऊं चंद्रधणी । वेळ लावियेला अझुणि । एकाकरितां गडे हो ॥ १ ॥ वाट काढिली गोविंदीं । मागे गोपाळांची मांदी ॥ २ ॥ अवघाची वावरे । वळा नेदी कोणी फिरे ॥ ३ ॥ घर पाहोनि एकांताचें । नवविधा नवनीताचे ॥ ४ ॥ रिघे आपण भीतरी । पुरवी माथुलियाच्या हरी ॥ ५ ॥ बोलों नेदी म्हणे स्थीर । खुणा दावी खारे क्षीर ॥ ६ ॥ जोगावल्यावरी । तुका करितो चाकरी ॥ ७ ॥" "हा बाल-गोपालांचा प्रांत आहे. येथें नियम बाल-गोपालांचे, थोरांचे नव्हे. आईनें शिंक्यावर ठेवलेले दूध व लोणीं हें मुलांच्या करतांच असतें. यांत चोरी कसली आणि कोण्याच्या घरीं ?" भगवान् श्रीकृष्णा, तुझा खेळ किती रम्य आहे रे !

घरांत कोणी नाहीं हे पाहून एकटाच घरांत शिरलास, बरोबरच्या सवंगड्यास गप्प रहाण्याचा आदेश दिलास, स्वतःच्या हातानें एकेक दहीहंडी दुसऱ्या हातीं दिलीस! विश्वव्यापकत्व दर्शविणारा पोरखेळ आहे हा.

खेळ खेळणारे श्री तुकाराम महाराज भगवान् श्रीकृष्णाशी किती एकरूप होतात, किती सलगानें बोलतात. "कान्होबा आतां तुझी माझीच गडे। कोणाकडे जाऊं नेदूं ॥ धृ० ॥ वाहीन तुझी भार शिदोरी। वळतींवरी येऊं नेदीं ॥ १ ॥ ढवळे गाईचे दूध काढूं। एक एकल्या ठोंबे मारूं ॥ २ ॥ तुका म्हणे टोकवूं त्याला। जे तुझ्या बोला मानीत ना ॥ ३ ॥" भगवान् श्रीकृष्णाच्या शिदोरीचा भार श्री तुकाराममहाराजांनीं आपल्या डोक्यावर घेतला; शुभ्रवर्ण गाईचें दूध दोघेजण मनःसोक्त प्याले; एकमेकांशी झोंबाझोंबी केली, आणि मग संतश्रेष्ठ म्हणतात, "श्रीकृष्णा, तुझा उपदेश जो कोणी मानित नाहीं त्याला चांगलाच 'टोकवून' काढीन!" अंतर्बाह्य श्रीकृष्णमय झाल्यानंतर निघालेले उद्गार आहेत हे.

कृष्णावतार म्हणजे प्रकाशमय जीवनाचें भूतलावर अवतरण, "कंठीं धरिला कृष्णमणी। अवघा जनीं प्रकाश ॥ धृ० ॥ काला वाटूं एकमेकां। वैष्णवा निका संभ्रम ॥ १ ॥ वांकुलिया ब्रह्मादिकां। उत्तम लोकां दाखवूं ॥ २ ॥ तुका म्हणे भूमंडळी। आम्ही बळी वीर गाढे ॥ ३ ॥" श्रीकृष्णा, तूं बरोबर असल्यावर कसली आहे रे उणीव? "तुझिये संगति। जाली आमुची निश्चिति ॥ धृ० ॥ नाहीं देखिलें तें मिळे। भोग सुखाचे सोहळे ॥ १ ॥ घरीं ताकाचे सरोवर। येथें नवनीताचे पुर ॥ २ ॥ तुका म्हणे आतां। आम्ही नवजों दवडितां ॥ ३ ॥ सर्व वस्तूंची रेलचेल। मधाच्या व दहीदुधाच्या नद्या वाहणारा काळ होतां तो.

श्रीकृष्णाच्या समागमामुळें श्री तुकाराममहाराजांना एवढा आनंद झाला कीं ते गाऊं लागले, "बहुबरा, बहुबरा। या सांगाते मिळे चारा ॥ धृ० ॥ म्हणोनि जिवेंसाटीं। घेतली कान्होबाची पाठी ॥ १ ॥ बरवा बरवा दिसे। समागम याचा निमिषें ॥ २ ॥ पुढती पुढती तुका। सोंकला सोंकवितो लोकां ॥ ३ ॥" स्वतः श्री तुकाराममहाराज श्रीकृष्णाशी एकरूप तर झालेच; शिवाय सर्व लोकांमध्यें त्यांनीं श्रीकृष्णाच्या उपदेशाचा प्रसार करण्याचें व्रतच आजन्म आंगिकारलें! मथुरेंत वास करणारा द्वारकाधीश पंढरपुरांत अवतीर्ण झाला आणि मग श्री तुकाराममहाराज पंढरीचा महिमा गाऊं लागलें, "पंढरीचा महिमा। देतां आणीक उपमा ॥ धृ० ॥ ऐसा ठाव नाहीं कोठें। देव उभा उभी भेटे ॥ १ ॥ आहेति सकळ। तीर्थे काळें देतीं फळ ॥ २ ॥ तुका म्हणे पाप। गेले गेल्या कळे ताप ॥ ३ ॥ यमुना-इंद्रायणीचा संगम तो हाच!

परमेश्वराचें स्वरूप निर्गुण व निराकार असले तरी सामान्य जनांच्या समजुतीसाठीं सगुण रूप धारण करावें लागतें व नैवेद्यही खावा लागतो. " धन्य त्या गौळणी देवाच्या पूजनी । नैवेद्य हिरोनि खातो कृष्ण ॥ १ ॥ अरे कृष्णा इंद्र अमर दविडिलो । कोण तयांप्रति येईल आता ॥ २ ॥ तुका म्हणे देव दाखवी विंदान । नैवेद्य खाऊन हासों लागे ॥ ३ ॥

सामन्यांचें सामान्यपण जाणून स्वतः भगवान् श्रीकृष्ण म्हणतात, " तुम्ही गोपी बाळा मज कैसा नेणा । इंद्र अमरराणा म्यां चि केला ॥ ध्रु० ॥ इंद्र चंद्र सूर्य ब्रह्मा तिन्ही लोक । माझे सकळीक यमधर्म ॥ १ ॥ मजपासुनिया जाले जीव शिव । देवांचाही देव मीच कृष्ण ॥ २ ॥ तुका म्हणे त्यांशी बोले नारायण । व्यर्थ मी पाषाण जन्मा आलों ॥ ३ ॥

प्रिय भक्त अर्जुनाला आपले विराट स्वरूप दाखविणारा श्रीकृष्ण सामान्य जनांसाठीं पंढरपूर येथें अवतीर्ण झाला. भगवान् श्रीकृष्णाचे विराट स्वरूप पाहून कोदंडधारी अर्जुनही घाबरला; सगुणरूप धारण करण्याची त्यानें श्रीकृष्णाला विनंती केली. भगवान् श्रीकृष्णांनीं अर्जुनाची विनंती मान्य केली. निर्गुण निराकार सगुण व आकारबद्ध झाला. तेंच गोमटें, साजिरें पंढरपूरचें विटेवर उभे असलेलें रूप !

Thou Art Gmnipresent, My Lor D. Give us Thy Grace !

—संसारी माणसावर कुटुंब पोषणाची जबाबदारी असते. ती जबाबदारी पार पाडीत असतां स्वतःचा स्वार्थ न पहातां कुटुंबियांसाठीं झटणें ही निःस्वार्थ सेवाच आहे. दैवयोगानें त्याच्यावर जी जबाबदारी पडली ती पार पाडण्यासाठीं मनोभावें झटणें ही कमी महत्त्वाची सेवा नाहीं.

—रमण महर्षि

# भक्ताधीन-भगवान

साई ग माझा जीव, साई ग माझे प्राण।
साई ग माझा देव, साई ग माझे धन ॥ १ ॥

साईच्या निवाऱ्याशी, तेवतो माझा दीप।
प्रशांत प्रकाशांत, रमते ग माझे मन ॥ २ ॥

साईच्या वृक्षावरी, वाढतो माझा वेल।
सुगंध सुमनांनीं, दरवळे हें जीवन ॥ ३ ॥

साईच्या कृपेवरी, उगाळी मी चंदन।
लाविण्या साईपदीं, करुनि त्या वंदन ॥ ४ ॥

बसती साईनाथ, माझ्या ग हृदयांत।
डोलतो आनंदात, चालतां ईश-गान ॥ ५ ॥

त्यांच्या संगें खेळे, जीव हा रात्रंदिन।
काळाचे नुरे भान, दशा ही सुखासीन ॥ ६ ॥

साई ग विश्व माझें, प्रेमाचे त्या कोंदण।
सत्य आणि धर्माचें, एकचि त्या भूषण ॥ ७ ॥

साई ग शब्दातीत, भक्तिच्या ग आधिन।
घाली मी लोटांगण, घेऊनि त्या शरण ॥ ८ ॥

—शाम जुवळे

# नामदेवाची अमृतवाणी [ हिंदी ]

अनुवादक : गणेश विष्णु कविटकर, एम. ए.

## तुझ बिन क्यूं जीऊं रे

अरे! मी तुझ्याविना कां व कसा जीवंत राहूं? तूं माझ्या प्राणाचा आधार आहेस. तुझ्याशिवाय मी कसा जिवंत राहूं? तुमचे नांव हेच मुख्य आहे. हेच मूळ आहे. संसार मिथ्या आहे. मनाला, वाचेला आणि आचरणाला कलियुगांत तुझ्याच नामाचा आधार आहे. संसार स्वतःच भीषण नरक असून त्यांत अधिकोत्तर अपार, दारूण दुःख आहे. हे सृष्टिकर्त्या ईश्वरा! तुझ्या चरणकमलाच्या छायेंत मला राहूं दे. तुझ्यात व माझ्यात पडदा कसला? लोभाने वासना वाढल्या आहेत. ज्यांनीं निश्चल अशा रामाचे स्मरण केले अशा कित्येक हरिभक्तांचा उद्धार केलास! लोभरूपी जलप्रवाहांत लोक वेदांच्या संगतीत वहात चालले आहेत. दास नामदेवाच्या स्वामी विठ्ठला! मला ह्या मोहरूपी धारेतून वल्हवून पार.

## लोग एक अनंत बानी

एका परमेश्वराचे अनंत प्रकारानें वर्णन करतात; पण माझे जीवन शारंगपाणी (ईश्वर) आहे. (अर्थात् माझी वाणी शारंगपाणीस वाहिलेली आहे.) ज्या ज्या रंगभवनांत लोक रंगून जातात त्या त्या रंगभवनाची भक्तांना गोडी वाटत नाहीं, तेथें ते अनुरक्त होत नाहींत. जो जो मार्ग संसाराकडे जातो त्या त्या मार्गाचा आम्ही दुरूनच त्याग केला. कोठल्यातरी लक्षणानें (चिन्हानें) लोक्या भ्रमांत पडून निर्वाणपदाचा मार्ग चुकला. प्रणाम करून नामदेव सांगतात कीं सद्गुरुच्या सान्निध्यांत आल्यानें परमतत्त्वाची ओळख झाली.

## लोक कहैं लोकाइ रे नामा

अरे नामदेवा! लोक बोलतात; ते वाटेल ते बोलतात! म्हणून तूं षट्दर्शन शास्त्राचे—न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, मीमांसा, वेदान्त यांच्या जवळसुद्धां जाऊं नकोस. कारण, तुझी भक्ति, परमेश्वराच्या ठिकाणीं असलेले तुझे प्रेम वा अनुरक्ति नष्ट होईल. ब्राह्मण षट्कर्मांचे म्हणजे यजन, याजन, अध्ययन, अध्यापन, दान व प्रतिग्रह यांचे आचरण करीत असतो. त्याच्याशी तुला कर्तव्य नाहीं. जो सर्वांत

निकृष्ट हरिभक्त आहे, त्याला केवळ रामनाम सांगावे. पापी, अशुचि, पतित, दुराचारी आहेत त्यांनी पंढरीनाथाचे नाम घ्यावे. ते सर्व माझे बांधव ( वर्ग ) असून माझे जीवन आहेत, मला ते परमप्रिय आहेत. त्यांच्या संगतीत मी रामनामाचे संकीर्तन करीन. एक लाख गाईंचे ब्राह्मणास दान दिले तर मनोवांछित सर्व कामना पूर्ण होतील; पण त्या दानाची तुलना पंढरीनाथाच्या दासाशी होणार नाही. म्हणून भक्तीच्या उद्देशाने नामदेव परमेश्वराचे यशगान करतो.

## का करौं जाती का करौं पातो

मला जातीला काय करावयाचे नि पातीला ( वंशाला ) काय करावयाचे आहे? माझे मन हा गज आहे. जिव्हा माझी कात्री आहे. रामनामांत रमून मृत्यूपाश कापून टाकू. भगवंताच्या अनंत नामाचा अंगरखा शिवूं. तो शिवीत असता मृत्यूची भीती पळून गेली. मी शिवणे शिवीन; आतांच शिवीन; पण रामरायाशिवाय सका जीवंत राहूं? ध्यानरुपी सुई आणि प्रेमाचा धागा करून नामदेवांचे मन हरिचरणी लागले आहे.

## राम नाम नरहरि श्रीवनवारी

नरहरि, श्रीकृष्ण ही रामाचीच नांवे होत. म्हणून निरंतन श्रीकृण चरणांची सेवा कर. श्रीगुरूंचा शब्द हा वैकुंठाला नेणारा मार्ग आहे आणि गुरुवचन हृदयरुपी ( प्रयाग ) क्षेत्रामध्यें प्रेमरस उत्पन्न करणारे आहे. ज्याच्याकरिता सारे त्रिभुवन धुंडाळले तो परमनिधान आपल्या देहातच आहे. म्हणून नामदेव म्हणतात, इतरत्र कुठेहि येणे नको वा जाणे नको. घरबसल्या राम नामस्मरण करावे.

## ऐसे मन राम नामैं बेधिला

सोने तोलताना जसें चित्त एकाग्र राखले जाते तसे माझे मन रामनामी वेधून गेले आहे. कागद आणून त्याचा पतंग करून ( मुलें ) आकाश मंडलात सोडून देतात व सोबत्याशी गप्पागोष्टी करीत असतात; पण त्यांचे लक्ष पतंगाच्या दोरीकडे खरीखरी असते, त्याप्रमाणें माझे चित्त रामनामीं लागले आहे. पाण्याचे कुंभ डोक्यावर घेऊन हास्यविनोद करीत व मैत्रिणींना टाळी देत चाललेल्या राजकुमारीचे व सुवासिनींचे चित्त डोक्यावरील घागरीकडे असते; दहा द्वारें असलेल्या मंदिरातुन गाई पाच पाच कोस जरी चरण्यासाठी फिरून आल्या तरी त्यांचे चित्त वासराकडेच लागलेले असते. नामदेव म्हणतात, हे त्रिलोचना! एक. पाळण्यात निजवून आपल्या घरात कामकाजात गुंतलेल्या आईचे चित्त जसे बालकाकडे असते तसेच माझे चित्त रामनामीं वेधले आहे.

### का नाचीला का गाईला

देवापुढे नाचले काय, गाईले काय किंवा चंदन उगाळून उगाळून (देवाला) उटी लावली काय ? जोपर्यंत आपपर भाव (अहंकार) नाहींसा झाला नाहीं तोपर्यंत मन चारहि बाजूनें भ्रमांत पडून असते. लोक कृत्रिमदेवापुढे नाचतात परंतु स्वयंभू देव मात्र कोणी जाणत नाहींत. स्वयंभुदेवाची सेवा जाणतो तो दिव्य दृष्टि होऊन सर्व कांहीं जाणतो. नामदेव म्हणतात, हीच माझी पूजा. आत्मतत्वा खेरीज दुसरें कांहीं नाहीं.

### अस मन लाव राम रसना

अरे मना ! रसनेला म्हणजे वाणीला ईश्वरनामाचा स्पर्श होऊं दे. म्हणजे जन्ममरणाचे फेरे पुनः पुनः होणार नाहींत. संगीतानें लुब्ध झालेला मृग त्या अवस्थेंत बाण लागला तरी ध्यानमग्न असतो. कीटकानें भुंग्यावर मन केंद्रित केल्यानें त्या कीटकाचाच भृंग होतो; दासानुदास नामदेव म्हणतात. (त्याप्रमाणें ईश्वराशी अनुरक्त झाल्यामुळें) हरीचरणाचा आश्रय मी आतां सोडणार नाहीं.


## "साई भक्तांस असूल्य संधी"

श्री साईलीला १९५८ (त्रैमासिक) एप्रिल ते १९५९ जानेवारी १९५९ (मासिक) एप्रिलपासून १९६५ मार्चपर्यंतचे, थोडे जुने अंक (विशेष अंकासह) शिल्लक असून, ते विक्रीस काढले आहेत. फुटकळ अंकास, (विशेष अंकासह) प्रत्येकीं दोन आणे २. पोष्टेज निराळें. (एक अंकासाठी पोष्टेज १० पैसे,) (दोन अंकास १५ पैसे,) (तीन अंकास २० पैसे,) (चार अंकास २५ पैसे.) वरीलप्रमाणें जुन्या अंकासाठी-किंमत टपाल खर्चासह (स्टँप-तिकिट) अगर मनीऑर्डरनें पाठवावी.

संपादक

श्री साईलीला मासिक

# दानाचा मंत्र

एकदा देव, दानव आणि मानव हे तिघेजण उपदेश घेण्यासाठीं ब्रह्मदेवाजवळ आले. सर्वांत पुढें दानव होते. त्यांनी ब्रह्मदेवाला उपदेश मागितला. ब्रह्मदेव म्हणाला "द".

दानवानी विचार केला आणि म्हटलं :

आम्ही दानव आहोत. नेहमी हिंसा करतो. ब्रह्मदेवाला हे आवडत नसावं. म्हणून त्यानं आम्हाला– "द" म्हणजे दयेचा उपदेश केला.

दानवानंतर देवांचा क्रम लागला. देवानांहि "द" हाच उपदेश मंत्र मिळाला.

देव म्हणाले,

"आपण नेहमी स्वर्गांत राहतो. इंद्रियांचे भोग भोगतो. ही वृत्ति वाईट आहे. ती ब्रह्मदेवाला आवडली नसावी. म्हणून त्यानं आपल्याला 'द' म्हणजे इंद्रियांचे दमन करा असा उपदेश केला असेल."

सर्वांत शेवटी मानव पुढं झाला. त्यालाहि ब्रह्मदेवाकडून तोच मंत्र मिळाला.

मानवानं आपल्या मनाशी ठरवलं,

"आपण नेहमी लोभी वृत्तीनं वागून संग्रह करतो. ब्रह्मदेवाच्या दृष्टीनं हें पाप आहे. या पापाच्या परिमार्जनासाठीं त्यानं आपल्याला "द" म्हणजे दानाचा मंत्र दिला असला पाहिजे. लोभ हा मनुष्यस्वभाव असला तर दान हा त्या वृत्तीवर उतार आहे."

आज आपण सगळीकडे पाहतो कीं प्रत्येक माणसाला लोभी वृत्तीनें ग्रासून टाकलं आहे. जणु प्रत्येक जण स्वार्थाचा दास बनला आहे. या वृत्तीमुळं अनेक अनर्थ ओढवले आहेत. आपली अर्धी–अधिक सामाजिक दुःखे या वृत्तीतून निर्माण झालीं आहेत. यावर उपाय म्हणून विनोबांनी भूदानाचा मार्ग शोधला.

विनोबा म्हणतात,

"जमीनदारांनी आपली जमीन भूमिहीनांना दिली पाहिजे. धनिकांनी पदरचा पैसा समाजात वाटला पाहिजे. आणि अशा प्रकारे समाजात दानाची गंगा सतत वाहती राहिली पाहिजे. त्याशिवाय समाजाचें स्वास्थ्य सुरक्षित राहणार नाहीं."

# साधकाची शिदोरी

## ( १ )

**साधनेच्या सहाय्यानें आपणास एकेक पायरी वर चढत जायचें आहे. खाणेंपिणें, झोपणें यासाठींच केवळ आपला जन्म नाहीं. आम्हांला जन्मा आलियाचें सार्थक करायचें आहे. साधनेची कांस धरल्याशिवाय तें कसें शक्य होणार ? त्यासाठीं पूर्व तयारी करावी लागते. ती कशा रीतीनें करायची ? त्यासाठीं थोडें थोडें मार्गदर्शन. हें केलें आहे सिद्ध पदाप्रत पोहोंचलल्यांनीं. तेव्हां त्याला महत्त्व आहे.**

आपल्या वाट्यास करण्यायोग्य जें कांहीं काम आलें असेल तें मन लावून नि आपणास ज्या साधनेच्या मार्गानें जायचें आहे तिला पोषक होईल अशा रीतीनें पार पाडायचें. तें आपल्या वाट्यास आलेले पवित्र कर्तव्य आहे, तें भगवंताकडून आलेलें आहे असें मानून तें उत्साहपूर्वक नि सावधानतापूर्वक पार पाडण्यासाठीं झटावयाचें. कोणतेंहि वाट्यास आलेलें कार्य हलके आहे या समजुतीनें त्याकडे तुच्छतेच्या दृष्टीनें पहाण्यांत येऊं नये.

× × ×

आपल्या वाट्यास यदृच्छेनें कोणतीहि परिस्थिति येवो; आपण कोणावर राग करायचा नाहीं किंवा कोणाचा द्वेष करायची नाहीं. वाट्यास येईल त्या स्थितीचा पुढील मार्ग आक्रमण करण्यासाठीं शिडीसारखा सदुपयोग करावयाचा. आपणास वर जायचें आहे. कोणत्याहि स्थितींत खालीं पडून रहायचें नाहीं. प्रत्येक परिस्थिती साधनरूप समजायची.

× × ×

मनुष्यमात्राला जें शरीर नि निरनिराळी इंद्रियें मिळाली आहेत, तीं कशासाठीं ? सर्वांची सेवा करून सेवारूपानें भगवंताचें उतराई होण्यासाठीं. मनही भगवंताची मोठ्यांत मोठी देणगी. त्या मनाचा उपयोग आपण भगवत् चिंतनासाठीं

करावयाचा आहे. अशा रीतीनें दोन्ही साधनांचा यथायोग्य उपयोग करून या जगांत आपण कृतार्थ व्हायचें आहे.

× × ×

बुद्धीचा उपयोग वादविवाद किंवा नसता काथ्याकूट करण्यासाठीं नसून आपण तिचा उपयोग सत्याचा शोध लावण्यासाठीं करावयाचा आहे. वेळेचा उपयोग सुखोपभोगांत सदैव दंग होऊन रहाण्यासाठीं करावयाचा नसून शांतपणें चिंतन करण्यासाठीं आहे. चिंतन कशाचें ? ज्यामुळें जन्मा आलियाचें सार्थक होईल अशा गोष्टींचे भलत्यासलत्या गोष्टींचें नव्हे !

× × ×

सच्चा साधक कोण ? साधकानें मुख्यतः काय करायचें ? त्यानें प्रथम स्वतःवर ताबा–आधिपत्य मिळविला पाहिजे. चुका हातून कोणाच्या होत नाहींत ? परंतु एकदां झालेली चूक पुन्हां होणार नाहीं याबद्दल दक्षता बाळगली पाहिजे. सर्वांच्या कल्याणासाठीं आपल्याकडून होईल तेवढें करायचें ! कोणाच्याहि अधिकारावर अतिक्रमण करायचें नाहीं. अशा रीतीनें आपलें जीवन परोपकारमय बनलें पाहिजे. तोच सच्चा साधक होऊं शकतो.

× × ×

प्रतिकूल परिस्थिति प्राप्त झाली असतां दुःखीकष्टी होण्याचें कांहीं कारण नाहीं. दुसऱ्या कोणामुळें आपल्यावर संकटें आलीं असें समजून त्यांचा द्वेष करणें, त्यांचें अहित चिंतिणें म्हणजे आपल्या दुःखांत भर घालून घेण्यासारखें आहे. तेव्हां वाट्यास प्रतिकूल परिस्थिति आली असतां बिलकूल डगमगून न जातां तिचा शक्य त्या परीनें सदुपयोग करून घ्यावयाचा आहे.

× × ×

प्रत्येक मनुष्यानें आपल्या वाणीवर ताबा ठेवण्यासाठीं झटलें पाहिजे. अद्वातद्वा बोलण्याची आम्हांला खोड जडली आहे. उगाच बडबड करण्याचा रोग पुष्कळांस जडलेला असतो. तो दुर्धर नाहीं. मनांत आणलें तर तो दूर करतां येण्यासारखा आहे. जरूर तेथें व जरूर तेवढंच बोलायचें; शक्यतों मौनव्रत पाळण्यासाठीं झटायचें. बोलणें अगदींच जरूर आहे असें वाटेल तेव्हांच तोंड उघडायचें.

× × ×

भगवंताचें नित्य स्मरण हें माझें पहिलें परम कर्तव्य आहे असें प्रत्येक साधकानें मानिलें पाहिजे. कोणतीहि परिस्थिति वाट्यास येवो ईशस्मरणाचा विसर पडतां कामा नये आणि त्यासाठीं नाम–जप अत्यंत उपयोगी आहे.

× × ×

माणसानें सत्कर्मांचें आचरण जरूर करावयाचें. तीं करण्यासाठीं मनापासून झटावयाचें; परंतु त्यांतच आसक्त होऊन राहूं नये. जीं जीं वाईट कृत्यें असतील त्यांचा प्रयत्नेंकरून त्याग करावयाचाच अशा निर्धारानें आपण वागले पाहिजे. सत्कर्म कोणतें नि कुकर्म कोणतें हें प्रत्येकाला समजतें; परंतु दुर्दैवानें माणसाचा ओढा सत्कर्मापेक्षां असतो कुकर्मांकडे! यासाठीं सक्त पहारा ठेवला पाहिजे.

× × ×

साधकाचें मुख्य कर्तव्य कोणतें? त्यानें स्वतःमध्यें जें कांहीं दोष असतील ते सारे शोधून काढायचें व ते दूर करण्यासाठीं परोपरीनें झटावयाचें. मात्र दुसऱ्यांचे दोष शोधून काढण्याची हीन कामगिरी आपण आपल्या शिरावर घेतां कामा नये. दुसऱ्यांचे दोष शोधायचे नि त्यांच्यावर विचार करायचा, हें माणसाचें पतन होय. त्या पापाचा धनी आपण व्हायचे नाहीं.

× × ×

प्रत्येक माणसांत कांहीं ना कांहीं कर्तबगारीचा गुण असलाच असतो. तिचा उपयोग लोकसेवेसाठीं करावयाचा हें आपलें धोरण असावें. आणि विचारशक्तीचा उपयोग ईशचिंतन, त्याचे गुण, त्याचे सर्व व्यापकत्व यासाठीं करण्यांत यावा. चिंतन, सेवा, श्रद्धा व प्रेम याबाबतींत प्रत्येक मनुष्य स्वतंत्र असतो. त्यांचा उपयोग कशासाठीं नि कशा रीतीनें करायचा हें ज्याचें त्यानें सारासार बुद्धीनें ठरवायचें असतें.



# ययाति राजाची गोष्ट

एक राजा होता. त्याचं नांव ययाति. ययाति सुखी होता. संपन्न होता. विद्वान होता. परंतु विलासप्रिय होता. तो नेहमी विलासात दंग रहायचा. चैनीत आणि भोग विलासात त्यानं आपलं सारं आयुष्य घालवलं.

एक दिवस तो आपल्या रंगमंदिरात आरशासमोर उभा होता. सुंदर चेहरा मोठ्या अभिमानानं निरखीत होता. अकस्मात त्याचं लक्ष डोक्यावरील केसांकडे गेलं तिथं एक पांढरा केस त्याला दिसला. तो पांढरा केस पाहताच ययाति चरकला. त्याच्या मनात नाना विचार आले. तो स्वतःशीच म्हणाला,

" हें सुंदर शरीर मला सोडावं लागणार का ? "

ययाति राजानं तावडतोब आपल्या प्रधानाला बोलावलं आणि म्हटलं :

" काय, माझं तारुण्य आता परत मिळणार नाहीं ? "

" यासाठीं ऋषिमुनींचा सल्ला घ्यावा लागेल." प्रधान म्हणाला.

दुसरे दिवशी राजा ययाति आणि त्याचा प्रधान असे दोघेंहि अरण्यात गेले. ऋषींच्या आश्रमात दाखल झाले. त्यांनी ऋषींना प्रश्न विचारला. आणि ऋषींनी त्यांना तपोबलानं तारुण्य प्राप्त करून घेण्याचा सल्ला दिला.

राजा आणि प्रधान या सल्ल्यानं सुखावून माघारी फिरले. ययातीनं तपश्चर्या केली आणि आपलं गेलेलं तारुण्य परत मिळवून घेतलं. पुनः ययाति आपल्या भोगविलासात दंग झाला.

कांहीं वर्षानंतर राजा पुनः म्हातारा झाला. आपल्या गेलेल्या तारुण्याची त्याला पुनः आठवण झाली. तो म्हणाला,

" माझं शरीर पुनः म्हातारं झालं परंतु इच्छा मात्र तशीच कायम आहे."

म्हणूनच विनोबा म्हणतात की, भोगाची तहान उपभोगानं कधीच शमत नाहीं. भोग आणि लोभ हे दोघेंही दुःखरूप आहेत. विचारपूर्वक आचरलेला संयम आणि केलेला त्याग यातच खरं सुख आहे !

—:०:—

# छोटयांसाठीं विनोबांच्या गोष्टी

मुलांना काय किंवा थोरांना काय, गोष्टींची आवड फार. गोष्टीच्या रूपानें कोणतेंही बोध-तत्त्व मुलांच्या मनावर बिंबते. संत विनोबा एकदां पवनार येथील आश्रमांत येऊन थोडे दिवस राहिले असतां त्यांच्या सभोंवार मुलांचा मेळावा जमा होत असे व गोष्टी सांगण्याचा आग्रह होत असेः प्रार्थनेंत येणाऱ्या एकेकाचा नावाचा इतिहास त्यावेळीं त्यांनीं मुलांस सांगितला.

## सिद्ध-बुद्ध

—सिद्ध बुद्ध स्कंद विनायक सविता पावक.

ह्या पैकीं पहिलीं दोन नांवें आज आपण विचारात घेऊ. 'सिद्ध, बुद्ध.' सिद्ध म्हणजे ज्याला साधलें आहे. आपण म्हणतो आपलें काम साधलें. म्हणजे काम बनलें. तेव्हा साधले म्हणजे पूर्ण झाले, सिद्ध म्हणजे जो पूर्ण झाला. आणि बुद्ध म्हणजे जागा झाला.

संसारात असंख्य माणसें राबतात. बारा तास झोपतात. बारा तास जागतात. पण एकंदर निजलेलींच असतात. बुद्ध म्हणजे जागा झाला. म्हणजे संसाराचें स्वरूप त्याला कळलें. तें ज्याला कळलं, तो झोपून राहणार नाही. हे दोन शब्द म्हणजे दोन मोठ्या परंपरा आहेत.

गौतम बुद्धाची जी परंपरा आहे, तिचें नांव बुद्ध आहे. महापुरुष कसा असावा? बुद्ध असावा. म्हणजे जागा झालेला असावा. दुसरी आहे जैन परंपरा. शब्द त्यांचा आहे सिद्ध. महापुरुष कोण? जो सिद्ध आहे म्हणजे पूर्ण जो आहे. भारतात जो जैन पंथ होता तो संयमप्रधान होता. जीवनात मनुष्याने मन आवरलें पाहिजे, इंद्रियें आवरलीं पाहिजेत, हा त्यांचा मुख्य विचार. आणि बुद्धाची परंपरा मुख्यतः कारुण्याची परंपरा होती. प्राणीमात्राविषयीं करुणा असावी. ह्या नांवांच्या आधीं आपण नारायण-पुरुषोत्तम नांवें पाहिलीत. ती दोन नांवें आपण वैदिक परंपरेने म्हणत असतो. तीन फार मोठ्या परंपरा भारतात फार प्राचीन काळापासून चालत आल्या

आहेत. आपण ज्यांना हिंदू म्हणतो ती वैदिक परंपरा. त्यांचें मुख्य लक्षण भक्ति. वैदिकांनी भक्तीचा विकास केला. बौद्धांनी करुणेचा विकास केला. ह्या तिन्हीं परंपरांनी मिळून देशात फार मोठें काम केलें. ह्या परंपरांतून अनेक महापुरुष, योगी, संन्यासी झाले आणि ते भारतभर हिंडले.

इथे ह्या ज्या मूर्ति सापडल्या आहेत, त्या वैदिक परंपरेच्या आहेत. ह्या आश्रमापासून थोड्या अंतरावर, रस्त्यावर गौतम बुद्धाची मूर्ति आहे. अशा बुद्धाच्या मूर्ति संबंध हिंदुस्थानात सापडतात. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत, आणि तिकडे आसामपर्यंत सापडतात. आम्ही अक्राणी महालात यात्रा करीत होतो. तेथेहि अशा मूर्ति सापडल्या आहेत. त्या भागात शिक्षण, संस्कार काही नाही. तेथेहि बुद्धाची मूर्ति सापडली. इतक्या परित्यक्त, ओसाड प्रदेशात बुद्धाचा संदेश पोचला होता. बौद्धांचा फार मोठा उपकार आहे भारतावर, आणि भारताच्या बाहेरहि. चीन, जपान, ब्रह्मदेश, लंका सगळीकडे हा संदेश पोचला होता, आणि सगळीकडे करुणेची मोठी लाट पसरली होती.

जैनांनी संयम शिकवला. संयमाबरोबर अहिंसा शिकवली. जैन परंपरा मुख्यतः श्रमण परंपरा म्हणजे संयम परंपरा समजली जाते. जैन सापालाहि मारीत नाहीत. गांधीजींच्या आश्रमातहि सापाला मारीत नसत. तुम्ही सापाला मारता का ?

— हो मारतो.

तुम्ही मारता. आम्ही मारतो. सर्वत्र मारतात. पण आम्ही आमच्या आश्रमात मारीत नसू. हे साप शेतांतील अनेक जंतू खातात. साप मारले तर शेतात इतके किडे होतील की शेतांनाच खातील. साप किडे खातात, म्हणजे ते परोपकारी आहेत. हा भाऊसाहेब इथे बसला आहेना, तो सापाला पकडतो. सापालापकडून दूर शेतात सोडून दिलें की झालें. मारायची जरूर नाहीं ते काही आपल्याला चावत नाहीत. सर्वच साप काही विषारी नसतात. ही सर्व जैन परंपरा आहे की प्राण्याला मारायचें नाही, आणि भ्यायचें नाहीं. अशा ह्या तीन परंपरा आहेत. कोणत्या तीन परंपरा ?

( मुलें चूप होती )

सापाला मारायचे नाही ही कोणती परंपरा ?

—जैनांची.

सर्व प्राण्याविषयीं करुणा कोणी सांगितली ?

—बौद्धांनीं

भक्तीचा विकास कोणी केला ?

—वैदिकांनी.

भक्ति, करुणा व संयम अशा या तीन परंपरा आपल्या देशात फार प्राचीन कालापासून आहेत. गीतेत भक्ताचीं लक्षणें सांगितलीं आहेत—

'कोणाचा न करी द्वेष, दया मैत्री वसे मनीं'
'सदा संतुष्ट जो योगी संयमी दृढ-निश्चयी
अर्पी मज मनो-बुद्धि भक्त तो आवडे मज'

ह्यात भक्तीचा उल्लेख आहे, संयमाचा उल्लेख आहे, दया-मैत्रीचा उल्लेख आहे. तिघांची शिकवण एकत्र केली आहे.

## स्कंद विनायक

काल आपण सिद्धबुद्ध पाहिले. आज आपण—

[बाबा स्तब्ध राहिले. मुलांनी वाक्य पुरें केलें.–'स्कंद विनायक पाहू' ]

स्कंद हा एक संस्कृत शब्द आहे. तें परमेश्वराचें विशेषण आहे. स्कंद म्हणजे खंडन करणारा. देवांचा सेनापति स्कंद मानला आहे. गीतेत भगवंत सांगतात– "सेनानीत तसा ( मी ) स्कंद" म्हणजे सेनापतींत मी श्रेष्ठ आहे. हें भगवंताचें रूप ज्याला आम्ही हल्लीं सरकारचें डिफेन्स खातें म्हणजे संरक्षण विभाग म्हणतो तो ईश्वराचा हा विभाग–स्कंद. आणि विनायक म्हणजे गणपति, ज्याला हल्लीं शिक्षण खातें म्हणतात.

स्कंद म्हणजे फार पराक्रमी. उपनिषदात कहाणी आहे. स्कंद हें नांव सनत्कुमाराचें आहे. सनत्कुमार महाज्ञानी होऊन गेले. त्यांनी नारदाला ज्ञान दिलें. नारद सनत्कुमारापाशी गेले. आणि म्हणाले की मला ज्ञान द्या. सनत्कुमार म्हणाले– 'तूं तर पुष्कळ शिकला आहेस, तुला काय ज्ञान द्यायचें ?' नारद म्हणाले,

"ऋग्वेदो यजुर्वेदः सामवेद अथर्वणश्चतुर्थ इतिहास पुराणः पंचमो वेदानां वेदः पित्र्यो राशिर्दैवो निधिर्वाकोवाक्यमेकायनं देवविद्या ब्रह्मविद्या भूतविद्या क्षत्रविद्या नक्षत्रविद्या सर्पदेवजनविद्या।"

हें सगळें मी शिकलो आहें–ह्यात ब्रह्मविद्या आली आहे, पण ती ब्रह्मविद्या, ज्यासाठी हें ब्रह्म-विद्या-मंदिर काढलें ती नव्हे. ह्या ब्रह्मविद्येचा अर्थ ब्राह्मणाचें शास्त्र.–इतकें ज्ञान असूनहि अंतःकरणाला शांति नाही. अंतःकरणातला शोक गेला नाही. तेव्हां हे

सनत्कुमारा, शोकाच्या पार कसें जावें हें शिकव.’—सनत्कुमार म्हणाले—तूं जें शिकलास ते सर्व शब्द आहेत. शाब्दिक विद्या आहे. शेवटीं सनत्कुमारांनी नारदाला आत्मज्ञान करून दिलें आणि संसाराच्या भयांतून मुक्त होऊन नारद निवृत्त झाले, कृतार्थ झाले. “मृदितकषायाय तमसः परं पारं दर्शयति भगवान् सनत्कुमारः।” सनत्कुमारांनी नारदाला, ज्याचे सर्व कषाय नष्ट झाले होते, म्हणजे चित्त शुद्ध झालें होतें अशा नारदाला अंधाराच्या पार प्रकाशाचा किनारा दाखविला. म्हणून सनत्कुमारांना स्कंद हें नांव दिलें. कारण ते संसाराचें खंडण करतात. संसार—ताप खंडण करण्याची भगवंताची जी शक्ति तिला स्कंद म्हणतात.

ज्ञान देण्याची भगवंताची जी शक्ति, तिला विनायक म्हणतात. दक्षिण भारतात स्कंदाची उपासना करतात. आणि गणपतीची उपासना सगळ्या भारतात करतात. उत्तम शिक्षण दिलें तर आतून रक्षण होतें. राष्ट्र संकटात राहत नाही. आणि तेवढ्यात संकट आलें तर स्कंद काम करतो. असें ह्या दोन्ही शक्ति मिळून काम होतें. म्हणून दोन नांवें एकत्र आलींत. काल आपण एक जोडी पाहिली. कोणती ?

—सिद्धबुद्ध.

दुसरी जोडी आज पाहिली ती कोणती ?

—स्कंद विनायक.

## सविता पावक

‘सविता पावक तू’. सूर्यनारायणाला सविता म्हणतात. तो मनुष्याला प्रेरणा देतो. शेतकऱ्याला म्हणतो, ‘ऊठ, कामाला लाग.’ पक्ष्याला म्हणतो, ‘ऊठ, गाणीं म्हण.’ मग कुणी काही, कुणी काही, निरनिराळीं कामें करू लागतात. तुम्ही उठता की नाही सूर्य आला म्हणजे ?

—हो उठतो. ( सगळीं मुलें एकदम उत्तरलीं. )

तर सूर्यनारायण प्रेरणा देतो. आणखी सूर्यनारायण काय करतो ?

( उत्तर नाहीं )

सूर्यनारायण काय करतो रे ? तो तुम्हाला काय देतो ?

—प्रकाश देतो.

सूर्यनारायण प्रकाश देतो. मग त्याचा उपयोग आपापल्या मर्जीनुसार करावा. तुम्हाला प्रकाशाचा उपयोग चांगला करायचा असेल, तर चांगला करा, वाईट करायचा असेल तर वाईट करा. तो फक्त प्रकाश देतो. त्या प्रकाशात तुम्हाला

चांगलें काम करायचें असेल, तर चांगलें काम करा, वाईट करायचें असेल, तर वाईट करा. प्रकाश देण्यापलिकडे तो तुमच्या कामात ढवळाढवळ करणार नाही. तो सर्वांचा सेवक आहे. तो दरवाजापाशी येऊन उभा राहील. सकाळीं त्याची किरणें तुमच्या दरवाजापाशी येतील. दरवाजा बंद असेल तर धक्का देऊन तो आत येणार नाही. जर तुम्ही उठला आणि दरवाजा उघडला तर तो आत येईल. पण दरवाजा बंद असला तरी तो बाहेर उभा राहील. असें म्हणणार नाही, की दरवाजा उघडत नाहीस, तर मी परत चाललो. म्हणजे तो नम्र सेवक आहे. आणि तुम्हाला माहित आहे का, तो कुठे राहतो ?

—आकाशात. ( एका स्वरात सगळे ओरडले. )

आकाशात राहतो म्हणजे उंच, अलिप्त राहतो. ज्ञानदेवांनी म्हटलें आहे, " भानुबिंब पहा निर्मळ निराळ." निर्मळ म्हणजे ज्यात मळ नाही असें. निराळ म्हणजे अगदी अलग, अलिप्त. कांही लोक सूर्याचे उपासक असतात. आपल्या देशातहि आहेत आणि बाहेरहि आहेत. पहा ना आपण त्याला सूर्यनारायण म्हणतो. नारायण असें नांव देतो. आणि त्याला देव समजतो. सकाळीं शेतकरी नांगर धरतो, सूर्य उगवला म्हणजे त्याला नमस्कार करतो आणि मग कामाला लागतो. त्यामुळें शेतकऱ्याला जीवनात गोडी असते, आणि तो निष्ठेने वागतो. म्हणून परमेश्वराची कृपा होत असते. हें झालें एक नांव.

दुसरें नांव आहे ' पावक '. पावक म्हणजे अग्नि. आपण घरात प्रवेश केला, की अग्नि हवा. थंडी म्हणून अग्नि हवा. स्वयंपाक करायचा तर अग्नि हवा. म्हणजे अग्नि साक्षात् सेवक आहे. सूर्य तुमचा भात शिजवून देणार नाही. अग्नि जी सेवा करतो, ती सूर्य करणार नाही. आणि सूर्य जी सेवा करतो ती अग्नि करणार नाही. अग्नि तुमच्या हातात आहे. माहित आहे कसा ?

—नाही.

तुमच्या खिशात आगपेटी असते, त्यात अग्नि असतो. ही अग्नीला खिशात ठेवण्याची युक्ति केली. सूर्य तुमच्या हातात नाही. सूर्यनारायण सेवा करतो, पण तो स्वामी आहे. अग्नि आपण हवा तेव्हा पेटवू शकतो. अग्नि आपला सखा आहे, भाऊ आहे. सूर्य प्रभू आहे. अग्नीला तुम्ही म्हणाल की घर जाळ. तर तो घर जाळील. तुम्ही म्हणाल, की रसोई कर, तर रसोई करील. जें तुम्ही म्हणाल, तें करायला तो तयार होईल. समजा उद्या तुम्हांला कुबुद्धि झाली आणि तुम्ही अग्नीला आग लावायला सांगितलें, तर तो आग लावील. मग आग लावली म्हणून तुम्ही पकडले जाल, तुम्हाला कोर्टात नेतील, तुम्ही ' म्हणाल, मी आग लावली नाही, अग्नीने

# ईश्वराचें दर्शन

पहिल्या प्रथम या सर्व संकुचित विचारांपासून सुटका करून घ्या व सर्व माणसांत ईश्वराला पहा. सगळ्यांच्या हाताने काम करणारा, सगळ्यांच्या पायांनी चालणारा, सगळ्यांच्या तोंडाने जेवणारा असा ईश्वर पाहण्याचा प्रयत्न करा. प्रत्येक प्राण्यात तो वास करीत आहे. प्रत्येक माणसाच्याद्वारें तो विचार करीत आहे. तो स्वयंसिद्ध आहे व आपल्या स्वतःपेक्षाही तो आपल्या जास्त जवळ आहे. हे जाणणें हाच धर्म होय. हीच खरी श्रद्धा होय. ईश्वर कृपेने अशी श्रद्धा सर्वांना प्राप्त होवो. जेव्हा या एकत्वाची प्रचीती येईल तेव्हां आपण अमर होऊन जाऊं. आपण भौतिक दृष्टीनें अमर व विश्वाशी एक रूपच आहोत. जोपर्यंत या विश्वात कोठेही एकदेखील प्राणी जीवंत आहे तोपर्यंत मी त्याच्यारूपाने जिवंतच आहे मी सीमीत नसून विश्वव्यापी आहे.

प्राचीन काळातील सर्व लोकांचे जीवन मीच आहे. भगवान बुद्ध, येशूख्रिस्त व महंमद पैगंबर यांचा आत्मा मीच आहे. मीच सगळ्या आचार्यांचा आत्मा आहे. दरोडे घालणारे सगळे दरोडेखोर मीच आहे आणि फासावर लटकविले गेलेले सगळे खुनीही मीच आहे. मीच विश्वव्यापी आहे. मग उठा जागे व्हा; हीच सर्वश्रेष्ठ उपासना आहे. तुम्हीं विश्वरूपच आहात. हीच खरी लीनता आहे, लोळण घेऊन,

---

लावली,' अग्नि म्हणाले, 'मी जबाबदार नाही. मला सांगितलें म्हणून मी आग लावली,' तर न्यायाधीश त्यांचें ऐकेल व तुम्हाला शिक्षा करील. म्हणजे काय, अग्नि तुमचा बंदा आहे. जर परमेश्वरच बंदा होऊन घरीं आला तर काय म्हणायचें? म्हणून अग्नीला भ्रातर म्हटलें. वेदात एके ठिकाणीं म्हटलें आहे–'तू पुत्र आहेस, तू बाप आहेस, तू भ्रातृ आहेस.' म्हणजे तो घरातला सदस्य झाला. तो मरेपर्यंत तुमच्या उपयोगी पडणार. म्हणून पूर्वीचे ऋषि अग्नीचे उपासक होते. आज पारशी लोक अग्नीचे उपासक आहेत.

स्वतःला पापी म्हणून हिनविणे नव्हे. द्वैताचे आवरण गळून पडल्याने होणारा हा सर्वश्रेष्ठ आध्यात्मिक विकास आहे. एकत्व हाच सर्वांत मोठा धर्म आहे. 'मी अमुक अमुक आहे हा झाला संकुचित विचार; हा कांही खरा आत्मभाव नव्हे. 'मी विश्वव्यापी आहे' या तत्त्वाला चिकटून रहा. त्या सर्वश्रेष्ठाचे सर्वश्रेष्ठ रूपात अर्चन करा.

कारण ईश्वर आत्मरूप आहे, म्हणून आत्मरूपाने व सत्याच्या रूपानेच त्याची आराधना करणें आवश्यक आहे. निकृष्ट स्वरूपांच्या उपासनेतून मानवाचे जडवादी विचार क्रमशः आध्यात्मिक उपासनेकडे वळतात. आणि शेवटी विश्वात व्याप्त असलेल्या त्या एकमेव अनंताची आत्मरूपाने तो उपासना करूं लागतो. सर्व परिच्छिन्न वस्तु जड असतात. केवळ आत्माच अनंत आहे. ईश्वर आत्मा आहे म्हणून अनंत आहे. तसेच माणूसही आत्मा असल्यामुळे अनंतच आहे. आणि अनंतच अनंताची उपासना करू शकतो. आपण अनंताची उपासना करू या. हीच सर्वश्रेष्ठ आध्यात्मिक उपासना आहे. या तत्त्वांचा साक्षात्कार किती भव्य पण किती कठीण आहे, मी तर्क करतो, बोलतो, तत्त्वचिंतन करतों, पण मध्येच कांहींतरी माझ्या मनाविरुद्ध होते आणि मी नकळतच रागावतो. मी विसरून जातो की या विश्वात माझ्या क्षुद्र 'मी' शिवाय आणखीही काही आहे. मी हे विसरतो की 'मी तर आत्मा आहे. या सर्व क्षुद्र गोष्टी मला काय करावयाच्या आहेत? मी तर आत्मा आहे. मी हे विसरून जातो कीं मीच हा सर्व खेळ खेळत आहे. मी ईश्वराला विसरतो. स्वाधीनता विसरतो.

—स्वामी विवेकानंद



# साई काय तुला वाहूं

तव चरणांवरी देह ठेविला
कांही न मजसी तव पूजेला
काय तुला देऊं । साई काय तुला वाहूं ॥ धृ० ॥

जें जें कांहीं तुज अर्पियले
तें तें सर्वही तूच निर्मिले
तव चिंतन हें एकच उरले
काय तुला देऊ । साई काय तुला वाहूं ॥ २ ॥

धूप दीप श्रृंगारही केले
नैवेद्यासी अन्न शिजवीले
मज दीनाचे कांहीं न यांतले
काय तुला देऊ । साई काय तुला वाहूं ॥ २ ॥

हृदय कमलही तुंच लाविले
शरीर अवये तुंच घडविले
माझे ऐसे कांहीं न उरले
काय तुला देऊ । साई काय तुला वाहूं ॥ ३ ॥

तुज सम तारण हार न मजला
तव चरणावरि देह ठेविला
उपेक्षूं नको 'वा' या दासाला
काय तुला देऊ । साई काय तुला वाहूं ॥ ४ ॥

—डी. वी. पोतनीस

# संतकवि श्रीदासगणु महाराज

लेखक : श्री. स. र. पांडे

(सन १८६७ ते १९६२)

आधुनिक महिपति म्हणून ज्यांचा कीर्ति सौरभ सर्व महाराष्ट्रभर दरवळत आहे असे हे साक्षात्कारी संत श्रेष्ठ गणेश दत्तात्रेय सहस्त्रबुद्धे

यांचे पूर्वज रत्नागिरी तालुक्यांतील कोनवडे गांवचे राहणारे. घराणें सुखवस्तु गोत्र शांडिल्य, अश्वलायनसूत्र, ऋग्वेदी चित्पावन ब्राह्मण. देशावर नशीब काढण्यासाठीं एक गृहस्थ करकब या गांवी आले व संपन्न स्थितींत स्थायिक झाले. मामलत मिळवाली, तो पणजोबा, आजा व चुलता या तीन पिढ्यापर्यंत चालू होती. श्रीदासगणुंचे वडिल दत्तात्रेय. घरकारभार पहात. ही शाखा नगर येथें स्थानांतरित झाली. आकोळनेरचे आप्पाजी रामचंद्र जहागीरदार हे यांचे मातामह. आईचें नांव सावित्री. मातृकुल ईश्वरनिष्ठ असल्यानें या संस्कारांचा वारसा श्रीदासगणुना पूर्णपणें प्राप्त झाला, पण वयाच्या तीशीपर्यंत सुप्त होता. तोपर्यंत पूर्व सुकृत सन्मुख झालें नव्हते.

यांचा जन्म पौष शु॥ ११ शके १७८९ (ई. स. १८६७) ला झाला. नांव ठेवलें नारायण, पण बाळाच्या पोटाचा व कानांचा विस्तार पाहून आजोबा एकनाथपंतांनीं बाळपणींच्या शरीराला साजेसे गणपति हें नांव दिलें. आपल्या अद्वितीय करणीनें पुढें हे बाळ नराचा नारायण झाल्यानें ठेवलेल्या नारायण नांवाची प्रतिष्ठा कायम राहिली हा भाग वेगळा! आजाआजोबांच्या प्रेमाच्या व कौतुकाच्या वर्षावाखाली संगोपन झालें. पौगंडावस्था मार्गक्रमण करूं लागली. लावण्या, छकड, पदें यांची रचना करून त्या तमासगिरांनीं आपल्या तमाशांत सुरेल आवाजांत गावींत! त्याकाळीं समाजाच्या जीवनांत तमाशा हेंच एकमेव मनोरंजनाचें स्थान! परिणामीं त्यांच्या काकू त्यांना अपमानकारक बोलल्या. श्रीदासगणूंच्या मानी व तेजस्वी वृत्तीला त्यामुळें धक्का बसला. त्यांनीं घरचा उंबरठा ओलांडला तो कायमचाच! सरळ पोलिसखात्यांत शिपायाची नोकरी दरमहा ९ रु. पगारावर पत्करली. श्रीदासगणुंचा स्वभाव विशेष '**न निश्चितार्थात् विरमंति धीराः**' या सुभाषितानें प्रत्ययांकित होतो. ते म्हणतात 'कुटुंबवेडे सरस्वती.' त्यांचा विवाह सन् १८९१ त! सासरे अष्टयाचे जहागीरदार नारायणराव रानडे! अपत्य यमुताई आतां सौ. फडके, पुणें! श्रीदासगणूंनीं पोलिसखात्यांत एक तपावधि नोकरी केली. त्यांचा मूळ पिंड

अध्यात्माचा. बुद्धिमत्ता तीव्र, विलक्षण चाणाक्षता, माणसाची पारख अचूक, व्यवहारांत अतीव कुशल! नोकरीतील काळांत सुष्टदुष्ट-सर्वांच्या अंतःकरणांत तळ शोधण्याचें काम, सुष्टांनी संस्कार ग्रहण केले. दुर्जनांना दुरूनच वंदन करून सोडले. मोहमयी नोकरी पण ते कोणत्याही मोहाला बळी पडले नाहींत! वागणें अनासक्तीचें. त्याचें प्रभावी कारण म्हणजे सत्पुरुष वामनशास्त्री इस्लामपूर या विद्वान गृहस्थाचा श्रीगोंदे मुक्कामीं अनुग्रह. हे सदाचारसंपन्न, कर्मनिष्ठ महान् भगवद्भक्त होते. त्यांचा सांप्रदाय रामदासी, पंथ वारकऱ्याचा, श्रीगुरूच्या आज्ञेवरून श्रीदासगणूंनीं आपल्या शिवोपासनेबरोबरच या गुरूनीं प्रदान केलेल्या उपासना यावज्जीव निष्ठापूर्वक आचरिल्या व स्वतःपुरता वैष्णवशैवोपासनेचा समन्वय करून पुढें स्वतःच्या कीर्तनांतून भगवंताच्या उपासनेप्रीत्यर्थ स्थापन झालेल्या सर्व उपासनांचा समन्वय उपदेशिला.

कान्हया भिल्ल या सुप्रसिद्ध दरवडेखोराच्या नायकाला पकडण्यासाठी श्रीदासगणूंची नेमणूक झाली. लोणी या गांवीं ते रामदासीच्या गुप्तवेषानें एका श्रीराम मंदिरांत राहिले. मंदिर झाडून साफ करून रोज एकाग्रचित्तानें त्या मूर्तीच्या पूजेच्या दैनंदिन कार्यक्रमाला लागले. उपासनेची अत्युत्कट आवड निर्माण झाली, आदर वाटला. नमस्कारासाठीं हात जुळूं लागले! कान्हया भिल्लसुद्धां प्रभावित झाला. त्यानें आपल्या गळ्यांतील सोळा तोळे वजनाचा सोन्याचा गोफ त्यांना सादर समर्पण केला. श्रीदासगणूंनीं त्याचा स्वीकार केला नाहीं. उलट त्याच्या पैशांतून देवळाची दुरुस्ती करण्यास पाटलास सांगितलें. या निर्लोभवृत्तीचा फार परिणाम भिल्ल नाईकावर झाला. दैववशात या कामगिरींतून प्रयत्नानें त्यांची मुक्तता झाली. जामखेड येथें ते बदलून गेले. येथें त्यांच्या सुप्त प्रतिभेचे नवे उन्मेष दीप्तिमान झाले. दाम जीपंताच्या स्वयंकृत आख्यानावर त्यांनीं येथें कीर्तन केलें. श्रोते मुग्ध झाले. पुढें नेवासे येथें बदली झाल्यावर तेथील नटनर्तक मोहिनीराजापुढे त्यांनी आपला डफ फोडून तमाशाचा नाद सोडून देऊन आपली वाणी व लेखणी परमेश्वराच्या सगुण स्वरूपाच्या वर्णनांत खर्च केली. श्रीसाईबाबा शिरडी यांच्या दर्शनानें ते पावन झाले. त्यांच्या आज्ञेवरून त्यांनीं नोकरीचा राजिनामा दिला व संतचरित्रें लिहिण्याचें कार्य त्यांनीं स्वीकारलें. श्रीसाईबाबानी यासाठीं त्यांचे कार्यक्षेत्र नांदेड मराठवाडा हे आगाऊच नियोजित केलें होतें, त्याचप्रमाणें तिकडच्या भागांत जाऊन त्यांनीं कीर्तन प्रचार केला, संतचरित्र साहित्य जमवलें व प्रत्यक्ष लेखनास सुरवात करून कांहीं काळानें तें लेखन संपवून त्या भक्तिलीलामृताच्या प्रकाशनानिमित्त ते पुणें येथें येऊन राहिले. श्री. वामन गोरेश्वर पोतदार यांचेकडे ते बहुधा असत. तेथें त्यांची व श्री. वि. का. राजवाडे यांची भेट झाली. योगायोगानें तेथें त्यांना दामोदर वामन आठवले ऊर्फ दामुअण्णा हे त्यांचे मानसपुत्र व नंतर पट्टशिष्य भेटले. त्यांचा सर्व

संसार श्रीदासगणुंनी सांभाळला. श्री. दामुआण्णा हे आपल्या गोड गायनानें श्रीदासगणूंच्या कीर्तनाची साथ करून कीर्तनाला रंगत आणीत व श्रोत्यांना मुग्ध करीत. पुढें हे क्षयानें कालवश झाले, तथापि त्यांच्या कुटुंबांच्या योगक्षेमाचें उत्तरदायित्व त्यांनींच सांभाळलें. सन् १९१९ च्या वैशाखांत त्यांच्या पत्नीनें इहलोक सोडला. तिचे और्ध्वदैहिक नांदेड येथें श्रीदासगणूंनीं संपन्न केलें. या ठिकाणीं गंगातीरावर एका योग्याची त्यांची भेट झाली, कांहीं यौगिक प्रक्रिया त्यांनीं त्यांचेकडून समजावून घेतल्या. त्यांच्या आचरणानें त्यांच्या शरीरस्वास्थ्याला बरेंच साहाय्य झालें.

श्रीदासगणु हे प्रभावी निर्लोभ कीर्तनकार होते. कीर्तनाची बिदागी ते घेत नसत. इंदूर संस्थानच्या व देवास संस्थानच्या दरबारांत त्यांची कीर्तनें झाल्यावेळीं आपल्या अंगच्या प्रसंगावधानानें उभय नरेशांच्या कौतुकाचा व आदराचा ते विषय झालें. श्रीसाईबाबांच्या ठिकाणीं त्यांची अव्यभिचारी निष्ठा होती. व्रतें वैकल्यें ते सापेक्षपानें आचरीत. त्यांच्या कर्मनिष्ठेला त्यांच्या परिणत प्रज्ञेचें अधिष्ठान होतें. गायत्री पुरश्चरणें त्यांनीं तीनदां केलीं. गोदावरी प्रदक्षिणा पण एका सिंहस्थांत त्यांनीं केली. त्यांची काव्यसंपदा विपुल आहे. भाषाप्रभुत्व दांडगें आहे. सर्वत्र भक्तीचा जिव्हाळा ओतप्रोत आहे. त्यांनीं लावण्या, पोवाडें छकड, ओव्या, पदे, चरित्रें, नाटक, मनाचे श्लोक, शिष्यबोध इत्यादि अनेक विषयावर अंदाजें दोन लक्ष संख्या परिमित लेखन केलें आहे. वेदांत त्यांच्या आवडीचा विषय. दंभाचा तिरस्कार, लेखनांत अमाप रसोत्पत्ति. अभ्यासुवृत्ति, भाषा साधी खेडवळालाही समजावी अशी. महाराष्ट्रांतील विद्वानांना त्यांच्या लेखनशैलीचें कौतुक वाटतें. बहुश्रुतता दांडगी. त्यांचा राष्ट्राभिमान संस्कृतीबद्दल अभिमान, धर्म याबद्दल प्रेम अप्रतीम आहे. त्यांची वृत्ति मृदु, करुणामय. प्रभुला प्रार्थना करतांना त्यांच्या नेत्रावाटे गंगायमुनेच्या धाराप्रवाहित होत असत. ते साक्षात्कारी विभूति होते. त्यांचा मित्र परिवार फार मोठा. ऋणानुबंधीयांत शेट, सावकार, व्यापारी, पांढरपेशे मध्यमवर्गीय यांचाही भरणा आहे. मोठा शिष्यपरिवार आहे. अशा थोर संतविभूतिच्या सहवासाचा लाभ भाविकांना अर्धशतक मिळाला हें त्यांचें महद्भाग्य होय. वाङ्मय तपाच्या निष्काम आचरणानें स्वयंभू व्यक्तिमत्वाला पूर्ण विश्वास पावलेला डौलदार असा लोभनीय थाट आलेला आहे. समाजाला ईश्वराभिमुख करून त्याचें उन्नयन त्यांनीं केलें. हा महापुरुष कार्तिक वद्य ११ दिनांक २५-११-१९६२ मध्यें पंढरपुर येथें श्रीपांडुरंगचरणीं लीन झाला. त्यावेळीं त्यांचे वय ९५ वर्षे होतें त्यांची समाधि चन्द्रभागेच्या वाळवंटांत बांधली आहे.

( पुरुषार्थवरून साभार )

# ' ईश्वरी साक्षात्कार व संपन्नता '

लेखक : केशव कृष्ण प्रधान

परमेश्वराचा साक्षात्कार झाल्यानंतर साधकावस्थेतून जीवनमुक्त स्थितीप्रत पोहच-लेल्या महात्म्यानें अत्यंत श्रेष्ठ दर्जाची व खरीखुरी संपन्नता कशी प्राप्त होते याचे अतिशय बहारीचे वर्णन सद्‌गुरु श्रीसाईबाबानीं अत्यंत उत्तम तऱ्हेनें आणि सोदाहरण श्रीसाईसत्‌चरीत्राच्या विसाव्या अध्यायात केले आहे. ते फारच उद्‌बोधक वाटल्यानें श्रीसाईलीलेच्या वाचकांना सादर करीत आहे.

'I wos a begger at the door of this world thou put royal robes on my person and made me a king.' आपण सर्व आयुष्यभर आपल्या गरजा व इच्छा पुऱ्या करण्याकरितां जगासमोर पदर पसरून एक प्रकारची भिकच मागत असतो. या दीनवाण्या भिक मागण्याच्या प्रकारातून थेट गरीबापासून ते तहत कोट्याधिशापर्यंत कुणीही सुटलेला नाहीं. याचे कारण आपला व जगांतील इतर माणसांचा आपल्या व्यवहारांत, व्यवसायांत प्रेमाच्या देवघेवीत न टाळता येणारा परस्पर संबंध हेच आहे. आपल्या विविध इच्छापूर्तीसाठीं आपल्याला कोणावरतरी अवलंबून रहावेंच लागते. विविध वस्तु, विविध माणसें हीं सर्व आपल्या सुखसोयीच्या व इच्छापूर्तिच्या साधनासाठीं आपल्याला वापरावीच लागतात. या सर्व वस्तु व सर्व माणसें आपल्या मनाप्रमाणें आपल्यास मिळाली नाहींत तर आपल्या नेहमीच्या सौख्यांत अपूर्णता आल्यानें आपण दुःखी होतो. व म्हणूनच साधुसंत श्रेष्ठ महात्मे आपणास ज्या सर्व इच्छा व आवडी ज्या मूळ इच्छेतून व आवडीतून निर्माण होतात, इतकेच नव्हे तर ते प्राप्त झाल्यावर कोणत्याही वस्तुवर अगर माणसांवर अवलंबून न रहाता सर्व इच्छा व आवडींची पूर्ती ज्यात होते असा सर्व सुखाचा उगम जो परमेश्वर त्याचा साक्षात्कार करून घेण्याचा आपणास उपदेश करीतात. तो साक्षात्कार झाल्यावर मगच आपणास खरोखरी संपन्नता प्राप्त होते. तोपर्यंत आपण जरी सार्वभौम राजे असलो तरी खऱ्या अर्थी भिकारीच असतो.

ही संपन्नता प्राप्त झाल्यावर आपण जरी एखाद्या जीर्ण पर्णकुटीत रहात असलो किंवा अंगावर फाटकीतुटकीं वस्त्रे धारण केली असली तरी आपणांस कोणाहीकडे कांहीही भिक मागण्याची जरुरी नसल्यानें ते दैन्यसुद्धा संपन्नतेनें मिरवीत

येते. जीवनमुक्त पुरुष जगातील साक्षात्कारी, आदिभौतिकदैन्य असेच संपन्नपणें मिरवतात. याचे कारण हवेच्या कणाकणामधून भरलेले परमेश्वराचे अस्तित्व साक्षात्कारी पुरुषाच्या शरीर, मन, बुद्धीवर असा कांहीं दिव्य साज क्षणाक्षणाला चढवित असते कीं, कोट्याधिश असो अगर भिकारी असो त्याला अशा पुरुषाच्या चेहऱ्याकडे पहाताच अत्यंत सौख्यमय अशी भावना होते. या साक्षात्कारी पुरुषाच्या मुळमोहळ्याचे वर्णन २० व्या अध्यायांत श्रीसाईबाबानी खालील गोष्टीरूपानें सिद्ध केले आहे.

श्रीसाईबाबांचे श्रेष्ठ भक्त श्रीदासगणू हे ईशावास्य उपनिषदाचे मराठीत सोप्या शब्दांत रुपांतर करीत असताना त्यांना दैन्यसुद्धां संपन्नपणें मिरविणें म्हणजे काय याबद्दल प्रश्न पडला. व त्यांनी ही अडचण शिर्डी येथें गेले असतां श्रीसाईबाबांच्या कानावर घातली. तेव्हां श्रीसाईबाबा त्यांना हंसून म्हणाले, "अरे त्यात कठिण ते काय? ती काकांच्या घरची मोलकरीणसुद्धां तुला ह्या प्रश्नाचे उत्तर देईल." काका म्हणजे श्री. काका महाजनी. ते मुंबईजवळ विलेपार्ल्याला रहात असत. शिर्डीहून परत येताना श्री दासगणू मुद्दाम त्यांच्या घरी उतरले. दुसरे दिवशीं त्याचे घरी नाम्या नावांचा गडी होता त्याची १६–१७ वर्षांची एक बहीण भांडी घासण्यास आली. व भांडी घासता घासतां ती 'काय माझी नवलाची साडी तिचा सुंदर भरजरी पदर' या अर्थाचे गाणे स्वतःशीच गुणगुणु लागली. दासगणू बाहेर येऊन तिच्या साडीकडे पाहू लागले. परंतु ती नेसलेली साडी तर फाटकी व जुनी होती. तेव्हां तिची त्यांना दया आली. व त्यांनी त्यांचे मित्र श्री. मोरेश्वर प्रधान यांजकरवीं तिला एक सुंदर साडी आणून दिली. ती नेसून दुसरेच दिवशी ती मोठ्या खुषीत कामावर येऊन इतर मुलींच्याबरोबर फुगड्यासुद्धां खेळली. परंतु तिसऱ्या दिवशीं मात्र पुन्हां ती आपले फाटकेच नेहमीचे लुगडे नेसुन कामावर आली. परंतु आज मात्र श्री दासगणूना ती फारच खुषीत दिसली. व ताबडतोब नेसलेले दैन्य घरी ठेवलेल्या सुंदर साडीच्या विचारांनी संपन्नपणें कसें मिरविता येते, या शब्दांचा अर्थ त्यांना पुरापुरा उलगडला.

'दैन्य संपन्नपणें मिरविणें' हे वरील साडीच्या वृत्तांतात सांगुन श्रीसाईबाबांनी श्री दासगणूना एक महान् बोध केला. अणुरेणूना, स्थावरजंगमाला, दऱ्या, खोऱ्याना, पर्वताना, वनस्पतिना, फळाफुलांना, पशुपक्षांना कृमिकिटकांना किंबहुना अखिल विश्वगोलाना कणाकणातून व्यापणारा चिद्घन असा परमेश्वर सर्व ठिकाणी कसा पूर्णपणें भरुन उरला आहे व त्याचा साक्षात्कार झाल्यानंतर त्याच्या या पूर्णपणाच्या जाणीवेनें अपूर्ण मानवाला कसं सर्व संपन्न वाटते, मग तो जगाच्या दृष्टीने भिकारी

स्थितीत असला तरी, हाच तो बोध होय. परमेश्वर गणीतांच्या वजाबाकी, भागाकार, गुणाकार यांत सापडत नाही. परमेश्वर सदैव पूर्ण असून वस्तुतः सर्व पूर्ण वस्तू आणि प्राणिमात्रांना आपल्या ठिकाणी धारण करतो. त्यांतून कांहीं बाहेर टाकता येत नाही किंवा त्याच्यामध्यें कांहीही आणखी ओतता येत नाही. परंतु आपण असे समजलें पाहिजे की, त्यांतून कांहीं वजा केले तरी तो शेवटी पूर्णच रहातो व कांहीही त्यात मिळविले तरीहि पूर्णच असतो. थोडक्यात त्याच्या पूर्णतेला कोठूनच बाध येत नाही. श्री. अरविंद म्हणतात कीं, "मुंगी आकारानें लहान असली आणि तिच्या तुलनेनें हत्ती कितीही मोठा असला तरी जितका परमेश्वर मुंगीत आहे तितकाच तो हत्तीत आहे. तो कोठेही जास्त किंवा कमी असा नसतो. तो सर्व ठिकाणी, सर्व वस्तूत, सर्व प्राण्यांत ते लहान असोत की मोठे असोत सारखा राहिलेला असतो. विश्वातील निरनिराळे गोल पृथ्वी, चंद्र, सूर्य, तारे शुक्र, मंगळ, शनि इत्यादि ग्रह वगैरे सर्व ठिकाणी किंबहुना निर्मितीत जितकी म्हणून भुवनें आहेत त्या सर्व ठिकाणी तो सदासर्वदा सारखा अगदी सारख्याच प्रमाणात असतो. एका मातीच्या कणात जितका परमेश्वर असतो तितकाच तो सर्व आकाशाला व्यापून असतो हे सर्व सकृत-दर्शनी व आधिभौतिकशास्त्रदृष्ट्या चमत्कारीक असे विधान वाटलें तरी ते पूर्णपणें सत्य आहे. व हे परमेश्वर अनुभूतिनंतरच कळून येते. कारण परमेश्वराची अनुभूति ही अशी स्थिती आहे की त्या स्थितीत अनुभव घेणारा उंची, खोली, रुंदी, लांबी, वर्तमान, भूत, भविष्य, दिशा या सर्व मर्यादांच्या पलिकडे जातो व तेथे त्यास या दिकालातित अशा परमेश्वराचे खरें स्वरूप अनुभवास येऊन दैन्य संपन्नपणें कसे निरवावे, इतकेच नव्हे संपन्नता म्हणजे काय याचा अनुभव येतो. तो साक्षात संपन्नताच बनतो आणि मग म्हणू लागतो, "I now know that I was a bronking and my role as begger before this world was shameful!"



# कृष्ण-गोपींच्या स्नेहाचा खरा अर्थ

--गुरुदेव रानडे

श्रीकृष्णाचें खरें आध्यात्मिक स्वरूप व त्याचें गोपींशीं असलेलें नातें यासंबंधीं लोकांत फारच गैरसमज माजला आहे. गोपींना कृष्णाविषयीं वाटत असलेलें प्रेम विषयीं होतें, त्यानें मुख्यतः गोपींच्या विषयवासनाच तृप्त केल्या व त्यास पुढें आध्यात्मिक स्वरूप देण्यांत आलें. म्हणून श्रीकृष्णाचा परमार्थ व कृष्ण-गोपींचा संबंधहि वस्तुतः विषयीच होता, असें कांहीं ग्रंथकारांचें मत आहे. परंतु, हें मत अत्यंत मूर्खपणाचें व बदनामीकारक आहे. लैंगिक प्रेमाचा आध्यात्माशीं यत्किंचितहि संबंध आहे ही गोष्ट आम्हांस मुळींच मान्य नाहीं. स्त्री-पुरुषांच्या विषयी व्यवहारांत खऱ्या परमार्थाचा अंशहि सांपडणें शक्य नाहीं. सिएन्नाच्या सेंट कॅथेरिन् नांवाच्या ख्रिस्ती संतिणीनें, किंवा त्याप्रमाणें इतर संतिणींनीं परमेश्वराशीं लग्न करण्याची तीव्र इच्छा धरिली. अर्वाचीन काळीं मिराबाई व कान्होपात्रा यांनींहि देवाशीं लग्न केलें. तामीळ संतीण अंडलनें ईश्वराशीं विवाह करण्याचा प्रयत्न केला. या सर्व उदाहरणांत जी विषयी प्रवृत्ति दिसून येते, ती म्हणजे ईश्वराविषयीं वाटत असलेल्या आध्यात्मिक प्रेमाचें निदर्शक आहे असें कित्येक लेखक मानितात. परंतु, हें खऱ्या परमार्थास लांच्छनास्पद आहे व ही खऱ्या परमार्थाची बदनामी आहे. विषयांशीं सहकार्य करून परमार्थ कधींच साधत नसतो. तर विषयांवर आपलें श्रेष्ठत्व प्रस्थापित केल्यानेंच परमार्थ साधतो. श्रीकृष्णाचा गोपींशीं कोणत्याहि प्रकारें विषयी संबंध होता ही कल्पनाच अशक्य आहे. खऱ्या परमार्थाचें मुळींच ज्ञान नसलेल्या अलीकडच्या कांहीं पुराणिकांनीं ही असत्य व विपरीत कल्पना भागवतांत घुसडून दिली असावी. म्हणून श्रीकृष्णाच्या सत्यस्वरूपाविषयीं परिक्षितानें केलेला प्रश्न व त्यास शुकाचार्यांनीं दिलेलें उत्तर हीं दोनहि सारखींच असंबद्ध आहेत. श्रीकृष्ण विषयासक्त होता ही गोष्ट खरी मानिली तर तो पवित्र कसा हा परीक्षिताचा प्रश्न योग्य ठरतो. परंतु, या प्रश्नास शुकाचार्यांनीं दिलेलीं किंवा त्यांस द्यावी लागलेलीं उत्तरें हीं अगदींच विपयास सोडून

आहेत. कृष्णानें व्यभिचार कां केला ? या परीक्षिताच्या प्रश्नास शुकानें दिलेलीं उत्तरें पोरकट वाटतात. ( १ ) प्रथम सर्वच देवांनीं व्यभिचार केला आहे असें विधान करून, व्यभिचारांत कांहीं पाप नाहीं व म्हणून श्रीकृष्ण या बाबतींत निर्दोष ठरतो, असें शुकाचार्यांनीं सांगितलें आहे. (२) अग्नि सर्व पापें जाळतो व श्रीकृष्णानें कांहीं पाप केलें असलें, तरी त्याचें खरें स्वरूप अग्नीसारखें असल्यामुळें तें जळून भस्म झालें असलें पाहिजे, अशी दुसरी उपपत्ति शुकाचार्यांनीं दिली आहे. ( ३ ) परमेश्वर पापपुण्यातीत आहे, असें मानिले पाहिजे. श्रीकृष्ण परमात्मा आहे. तेव्हां त्याचें वर्तन पापपुण्यापलीकडे असलें पाहिजे, ही शुकाचार्यांची तिसरी उपपत्ति होय. ( ४ ) श्रेष्ठ माणसांची कृति त्यांच्या शब्दांशीं सुसंगत असलीच पाहिजे असा नियम नाहीं. म्हणून कृष्णाच्या कृतीनें त्याच्या अत्यंत श्रेष्ठ अशा तत्त्वज्ञानावर किंवा शिकवणुकीवर कांहीं अनिष्ट परिणाम झाला नाहीं. ( ५ ) लोकांचीं सर्व कर्मे त्यांच्या पूर्वसंचिताप्रमाणें घडतात. तेव्हां श्रीकृष्णानें गोपींशीं शृंगारचेष्टा केल्या त्या म्हणजे त्याच्या पूर्वकर्मांचीं फळें होत. म्हणून त्याबद्दल दोषी ठरत नाहीं. ( ६ ) गोपींच्याप्रमाणेंच त्यांच्या पतींचें अंतरंग श्रीकृष्णाच्या दिव्य रूपानें भरून गेल्यामुळें त्यास व्यभिचाराचा दोष मुळींच लागला नाहीं. ( ७ ) शुकाची सातवी उपपत्ति याहीपेक्षां जास्त गंमतीची आहे. श्रीकृष्णानें आपल्या मायेनें प्रत्येक गोपीच्या पतीपुढें दुसऱ्या गोपी उत्पन्न केल्यामुळें मूळ गोपींचा उपभोग घेण्यास कांहींच हरकत राहिली नाहीं ! ईश्वरास आपल्या पापापासून मुक्त होण्यासाठीं एखाद्या मांत्रिकाप्रमाणें किंवा जादुगाराप्रमाणें हातचलाखी करावी लागते, यावरून वरील विचारपद्धति किती चुकीची व मूर्खपणाची आहे, हें उघड दिसतें ! वरील सर्व उपपत्ती पोरकट व असंबद्ध आहेत. श्रीकृष्ण–गोपींच्या सत्य स्वरूपाबद्दल प्रतिपादिलेली मानसशास्त्रविषयक उपपत्तीच थोडीबहुत विचारणीय ठरते. श्रीकृष्ण–गोपींचा संबंध म्हणजे आत्मा व इंद्रियें यांच्या संबंधाविषयीं केलेलें रूपक होय, असा या उपपत्तीचा मतितार्थ आहे. श्रीकृष्ण–गोपींचा संबंध वैषयिक होता या समजुतीवर आधारलेला कोणताहि भक्तिपंथ म्हणजे गवताच्या खुंटावर बांधलेल्या इमारतीप्रमाणें डळमळीत राहणार, ही गोष्ट या सर्व उपपत्तींवरून सिद्ध होते. गोपींनीं श्रीकृष्णाच्या सहवासाचा आनंद कसा लुटला असेल याविषयीं एक आध्यात्मिक उपपत्तीहि देतां येईल. आत्म्याचा अनुभव घेत असतां प्रत्येक गोपीपुढें एकदम एकसारखाच दिसूं लागल्यामुळें त्या दर्शनाचा आनंद गोपींनां पृथक व एकत्रित एकदम लुटला असा याचा अर्थ होणार नाहीं काय ?

पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांनाहि ईश्वरी साक्षात्काराचा आनंद लुटतां येतो, ईश्वर स्त्री-भक्तांचा पति आहे, असें मानणें जितकें मूर्खपणाचें आहे, तितकेंच तो पुरुष-भक्तांची पत्नी आहे, असें मानणेंहि मूर्खपणाचें आहे. ईश्वराच्या बाबतींत वैषयिक संबंध अगदीं अशक्य आहे. म्हणून अध्यात्मशास्त्रांत प्रणयास किंवा विषयोपभोगास मुळींच अवकाश नाहीं हें अक्षरशः खरें आहे.

# अहंकार-त्याग हाच खरा त्याग

घर सोडून जंगलांत जाऊन राहिल्यानें मोक्ष मिळतो का? शुभ्र वस्त्रांचा त्याग करून भगवीं वस्त्रें परिधान केल्यानें तरी मोक्ष मिळेल का? आपल्याठायीं प्रकर्षानें वास करणाऱ्या अहंकाराचा त्याग हाच खरा त्याग होय. तो त्याग करण्यांत आपण यश मिळविलें पाहिजे. मी म्हणजे माझा देह ही खोटी समजूत आहे. देहाभिमानाचा व इतर अन्य प्रकाराचा जो अहंकार दृढमूल होऊन राहिला आहे त्याचा त्याग करण्यांत आपण यश मिळविलें पाहिजे.

हा त्याग कसा शक्य होईल? अभ्यासानें. सतत अभ्यास व तोच निदिध्यास हा राजमार्ग आहे. आपल्या मनांत नानाप्रकारचे खोटे भ्रम वास करीत आहेत. त्या भ्रमांचें जाळें आपण समर्थपणें तोडून टाकलें पाहिजे.

सारें खरें; परंतु हा भ्रमनिरास साधायचा कसा? त्यासाठीं परमात्म्याचें आपण सतत स्मरण केलें पाहिजे. सतत त्याचे ध्यान करूं लागलां म्हणजे मनांत सद्भावना वास करूं लागतील. या बाबतींत सत्संग हा फार मोलाचा आहे. त्याची फार जरुरी आहे. सत्संगाची आवड मनांत उत्पन्न व्हायला पूर्वपुण्याई लागते. उगाच नाहीं सत्संगाकडे वळण्याची बुद्धि होत! त्याचबरोबर उत्तमोत्तम सद्भावनापोषक ग्रंथांचें वाचनही सहाय्यभूत होत असतें. अशा ग्रंथांचें पठण व मनन अत्युपयोगी आहे हें साधकानें नेहमी लक्षांत बाळगणें जरूर आहे.

—:०:—

# कोण तुजसम मज साईराया



कोण तुजसम तारील, मज साईराया, कैवारी सदया ॥
तूंच माझी माता, तूंच पिता, तूं मज रक्षिता ॥
भयाण जगी अवघ्या या ॥ ध्रु० ॥

तूंच पतितपावन, तूं करुणाघन, तूं कृपासिंधु
तूं भवभय निवाराया ॥ १ ॥

तूंच दाविसी भय, तूं करिसी निर्भय, तूं पुण्याचा संचय,
नेसी पाप विलया ॥ २ ॥

तूं शिरडीप्रति...तूं समिप असशी...तूं पाठिसी,
सदैव मज रक्षाया ॥ ३ ॥

—सौ. श्री शहाणे, डोंबिवली

# भक्तास आलेला अनुभव

## मित्राचे मुलांस पुनर्जन्म

लेखक : डी. वी. पोतनीस, खडकी पुणे ३

खडकी येथील माझे मित्र श्री. लालमनसींग संडिर राहणार जुना बाजार दर्जीगली खडकी पुणे ३. हे श्रीसाईबाबांचे एकनिष्ठ सेवक आहेत. दिनांक २७।८।१९६७ गोकुल अष्टमी या दिवशीं त्यांचा मुलगा राजेंद्रकुमार वय वर्षे दोन यांस पोलीओचा अटॅक आला. खडकी येथील डॉ. वाघोलीकर यांचे सल्यानुसार त्या मुलाला पुणे येथील डॉ. एम. व्ही. फडके ( डेकन जीमखाना ) यांचे हॉस्पिटलमधे तावडतोब उपचारासाठी नेण्याबद्दलचा निर्णय घेण्यांत आला. आम्ही ( मुलाचे वडिल, आई, मुलगा आणि मी ) भाड्याची टॅक्सी ठरविली; सद्गुरु साईबाबांची उदी त्या बालकाला लावली व त्यांचा आशिर्वाद मिळण्याबद्दल प्रार्थना केली व टॅक्सीत सर्वजण बसलो.

आमची टॅक्सी खडकीमधील डॉक्टर पाटील यांचे दवाखान्याजवळ येते न येते तोंच एक लहान मुलगा वय अदमासे तीन वर्षांचे एका स्कुटरखाली दोन चाकां-मधे सांपडला. स्कुटरचे पुढचे चाक त्याचे अंगावरून आम्ही गेलेले पाहिले आणि पुढचा प्रसंग आम्हाला पाहवणार नाहीं म्हणून डोळे घट्ट मिटून घेतले. पुन्हा डोळे उघडून पाहतो तो आश्चर्याचा धक्काच बसला. ते बालक स्कुटरचे दोन चाकातून निघून उठून उभे राहिले, व रस्त्याचे एका कडेला थांबले. श्रीसद्गुरु साईबाबानी त्या बाळाचे प्राण वाचविलें. मी सर्वांना सांगितले कीं, हा चमत्कार किती भयंकर आहे. त्या मुलाचें प्राण वाचलें म्हणजेच आतां आपलाही राजेंद्रकुमार चांगला बरा होईल. त्या बिचाऱ्या माऊलीला तर धीर आला परंतु त्या माऊलीने श्रीसाईबाबा नामस्मरण चालू केले. डॉ. फडके यांचे दवाखान्यांत त्या मुलाला औषध उपचार सुरू झाले आणि फक्त आठ दिवसांत श्रीसाईकृपेनें पोलीओचा जोर कमी होऊन राजेंद्रकुमारास घरी आणले.

राजेंद्रकुमार आतां नाचतो उड्या मारतो व आपल्या बाल लिलेने आपले आई-वडिल यांना हसवितो.

" श्रद्धा सबुरीने लावी उदी भाळी
निश्चये संकट त्यांचे साई टाळी "……श्रीसाई—



# भोगेच्छा नि वासनाक्षय

सुखोपभोगांची इच्छा नाहींशी झाल्याशिवाय वासनाक्षय होऊं शकत नाहीं. भोगांची इच्छा संपूर्णपणें नाहींशी झाली पाहिजे; त्याशिवाय चित्ताला शांतता मिळणार नाहीं. भोगांमुळें सुख मिळतें हा विचारच मारक आहे. भोगेच्छा सोडून सत्संगाकडे आपण आस्ते आस्ते लक्ष वळविलें पाहिजे. तें न करतां तुम्हीं कितीही पूजा-अर्चा, जप-तप, तीर्थयात्रा करो; त्यांचा उपयोग तुम्हांला कांहीभरही होणार नाहीं.

आत्म-विचार, सत्संग नि श्रीहरी-स्मरण हीं नित्यनेमानें करीत राहिलें पाहिजे. आपणास याची आसक्ति, त्याची आसक्ति कां बरं वाटते ? केवळ अज्ञानामुळेंच. हरी-स्मरण ही सर्व रोग नाहीसे करणारी मात्रा आहे. आसक्तीमुळें आपण बंधनांत अडकतों. हें बंधन आपणास तोडतां आलें पाहिजे.

' न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा । '

या वचनाचा आपण निदिध्यास घेतला पाहिजे. त्याचें मनन सतत करीत राहिलें पाहिजे.




# डिसेंबर १९६७

या महिन्यांत भक्तांची श्रीसाईनाथ दर्शनार्थ गर्दी नाताळ सुट्टीमुळें फारच होती कांहीं कलाकारानी श्रीपुढें हजेरी दिली ती खालीलप्रमाणें—

**कीर्तन**

श्री. ह. भ. प. नरहरीबुवा महादेवबुवा तळेकर ( अमृतराय ) पैठण, जि. औरंगाबाद ( मराठवाडा )

संस्थान गवई श्री. विठ्ठलराव मराठे यांची तीन कीर्तनें या महिन्यांत झाली. ( मार्गशीर्ष शु. ११ श्रीदत्तजयंती · मार्गशीर्ष वा॥ ११ अशी झाली. )

**गायन**

श्री. बाबुली भास्कर चारी करमाळकर वाकोल, सांताक्रूझ

श्री. प्रभाकर कृष्णा चारी वाकोला, सांताक्रूझ मुंबई नं. ५५

श्री. मोहनलाल शर्मा, न्यू दिल्ली, श्री. दगडू सोनू जोशी, जळगाव, पू. खा.,

श्री. विठ्ठल शंकर हेदूकर, सांताक्रूझ मुंबई ५५

**प्रवचन**

श्री. दिनकर शंकर मुजुमदार, मु. साखळी ( जळगाव ) पू. खा.

**भजन**

श्री. मोहन शांताराम कसवेकर, ( साई आध्यात्म भजनी मंडळ ) मुकाम पणजी ( गोवा )

**बँडवादन**

श्री. मदन आनंदराव चौधरी, गिरगांव मुंबई

श्री. मधुकर नारायण रामन्, मु. त्रिचनापल्ली ( मद्रास )

श्री. वसंत शंकरराव केरकर, मुंबई ( हार्मोनियमवादन )

ॐ विजय बँडपथक मुंबई

**नकला**

श्री. प्रल्हाद हरी लव्हाटे, बोरिवली मुंबई ६६

**श्रीदत्तजयंती**

श्रीदत्तजयंती निमित्त संस्थानतर्फे, श्री. विठ्ठलराव मराठे यांचे श्रीदत्तजन्म कीर्तन, व रात्रौ श्रींचे रथाची गांवांतून मिरवणुक असा सालाबादप्रमाणें कार्यक्रम झाला.



Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ८-०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ४-०० |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality** | | -by Pradhan | १-०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** | (Telgu) | | १-०० |
| (८) | **श्री साईलीलामृत** | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| (९) | **साईबाबा-अवतार व कार्य** | (मराठी) | श्री. धोंड | २-०० |
| (१०) | **साईबाबांचे ४ अध्याय** | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (११) | **सगुणोपासना** | (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१२) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | **श्री रुद्राध्याय ११ वा** | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१४) | **कीर्तन पंचक** | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१५) | **शीलधी** | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१६) | **श्री साईगीतांजलि** | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (१७) | **Guide to Shirdi** | (English) | | ००-१२ |
| (१८) | **स्तवनमंजिरी व सुमनांजली** | (मराठी) | | ००-२० |

**व्ही. पी. ची पद्धत नाहीं.**

### Colour pictures of Sai Baba by Neroy

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 9½" × 13½" medium | 00-37 |
| (2) | ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | 00-50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 50 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा) :

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.

2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

ालक : श्री साईबाबा संस्थान, शिरडी, आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते, त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५१४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई

टेलिफोन : ७५०५७

डी. डी. नेरॉय यांनी खास तयार केलेले श्री साईबाबांची तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणी मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक : श. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक : द. दि. पाटणकर, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.